POSTAL REGISTRATION : PLG/255/2026-2028

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष-०५ ● अंक-२८३ ● मुंबई, शनिवार, १६ मे २०२६ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

ओला, उबर, रॅपिडो ॲप आता डायरेक्ट गूगल प्ले स्टोअरवरुनच डिलीट होणार?

परिवहन मंत्र्यांच्या आदेशानंतर महाराष्ट्र सायबर पोलिसांची मोठी कारवाई



■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या आदेशानंतर महाराष्ट्र सायबर पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. ओला, उबर, रॅपिडो ॲप आता डायरेक्ट गूगल प्ले स्टोअरवरुनच डिलीट होणार आहेत. राज्यात बेकायदेशीरपणे सुरू असलेल्या अनधिकृत बाईक टॅक्सी सेवांविरोधात परिवहन विभागाने कठोर भूमिका घेतली आहे. ओला, उबर आणि रॅपिडोसारख्या अनधिकृत बाईक टॅक्सी ॲप सेवा तात्काळ बंद करून संबंधित कंपनी मालकांवर FIR दाखल करण्याची मागणी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केली आहे.

बेकायदा बाइक टॅक्सी ॲप्स हटवण्याचे आदेश महाराष्ट्र सायबर सेने गूगल प्ले स्टोअरला दिले आहेत. ओला, उबर, रॅपिडो प्ले स्टोअर लिंकसह महाराष्ट्र सायबर पोलिसांनी गूगलला पत्र दिले आहे. परिवहन मंत्र्यांच्या तक्रारीनंतर सायबर पोलिसांनी हे पाऊल उचलले आहे. प्रवासी सुरक्षेला धोका असल्याचा दावा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केला आहे. महाराष्ट्र सायबर विभागाच्या अतिरिक्त पोलीस महासंचालकांना अधिकृत पत्र पाठवले आहे. तसेच परिवहन आयुक्तांनी देखील अशा आशयाचे पत्र सायबर क्राईम विभागाला दिले आहे.

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांचे पत्र

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी ओला, उबर, रॅपिडो ॲप वर कारवाई करण्या संबधात पत्र पोलिसांना दिले आहे. मंत्री सरनाईक यांनी पत्रात नमूद केले आहे की, राज्यात गेल्या काही महिन्यांपासून विविध ॲप्सच्या माध्यमातून कोणतीही वैध परवानगी, शासन मान्यता किंवा परिवहन विभागाच्या नियमांचे पालन न करता प्रवासी वाहतूक सुरू आहे. विशेषतः रॅपिडोसारख्या संस्थांच्या अनधिकृत बाईक टॅक्सींचे प्रमाण वाढत असून, ही बाब सार्वजनिक सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत गंभीर असल्याचे त्यांनी म्हटले आहे. या अनधिकृत सेवांमध्ये प्रवाशांच्या सुरक्षिततेची कोणतीही हमी नसून चालकांची पडताळणी, विमा संरक्षण, महिला सुरक्षाविषयक उपाययोजना तसेच आपत्कालीन प्रतिसाद यंत्रणा अत्यंत अपुरी असल्याचा आरोपही त्यांनी केला आहे. त्यामुळे नागरिकांच्या जीवितास गंभीर धोका निर्माण होण्याची शक्यता असल्याचे पत्रात नमूद करण्यात आले आहे.

मंत्री सरनाईक यांनी नुकत्याच घडलेल्या एका अपघाताचाही उल्लेख केला आहे. मुंबईतील मुलुंड –गोरेगाव लिंक मार्गावर अनधिकृत बाईक टॅक्सीचा अपघात होऊन एका महिलेचा दुदैर्वी मृत्यू झाल्याचे त्यांनी नमूद केले असून, या प्रकरणी नवघर पोलीस ठाण्यात FIR दाखल झाल्याची माहितीही पत्रात देण्यात आली आहे. तसेच विविध पोलीस ठाण्यांमध्ये अशा प्रकारच्या घटनांची नोंद होत असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले आहे.

शासनाच्या परिवहन नियमांचे खुलेआम उल्लंघन करून या ॲप्समार्फत आर्थिक व्यवहार सुरू असल्याने परवानाधारक रिक्षा व टॅक्सी चालकांच्या व्यवसायावर अन्यायकारक परिणाम होत असल्याचे परिवहन विभागाने म्हटले आहे. कायद्याला न जुमानता सुरू असलेली ही व्यवस्था राज्याच्या परिवहन व्यवस्थेसाठी गंभीर आव्हान बनत असल्याची चिंता व्यक्त करण्यात आली आहे.

सायबर क्राईम विभागाकडे करण्यात आलेल्या मागण्यांमध्ये अनधिकृत बाईक टॅक्सी ॲप्सचे ऑनलाईन संचालन तात्काळ बंद करणे, संबंधित ॲप कंपन्या, चालक आणि व्यवस्थापनाविरुद्ध माहिती तंत्रज्ञान कायदा व मोटार वाहन कायद्यानुसार कठोर कारवाई करणे तसेच कंपनी मालकांवर गुन्हे दाखल करण्याचा समावेश आहे. सायबर गुन्हे विभागाकडे करण्यात आलेल्या मागण्यांमध्ये अनधिकृत बाइक टॅक्सी ॲप्सचे ऑनलाईन संचालन तात्काळ बंद करणे, संबंधित ॲप कंपन्या, चालक आणि व्यवस्थापनाविरुद्ध माहिती तंत्रज्ञान कायदा व मोटार वाहन कायद्यानुसार कठोर कारवाई करणे; तसेच कंपनी मालकांवर गुन्हे दाखल करण्याचा समावेश आहे. राज्य शासन नागरिकांच्या सुरक्षिततेबाबत कटिबद्ध असून, कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या कोणत्याही अनधिकृत व्यवस्थेला पाठीशी घातले जाणार नाही, असा स्पष्ट इशारा सरनाईक यांनी दिला आहे.

खर्डी येथे 'महाराजस्व समाधान शिबिरा'ला उत्स्फूर्त प्रतिसाद

1764 अर्जांचा जागेवरच निपटारा

■ठाणे। प्रतिनिधी,

राज्य शासनाच्या लोकाभिमुख धोरणांतर्गत, महसूल व वन विभागाच्या वतीने संपूर्ण महाराष्ट्रात 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान' राबविण्यात येत आहे. या अभियानाचा पहिला टप्पा शहापूर तालुक्यातील खर्डी महसूल मंडळात नुकताच संपन्न झाला. या शिबिराच्या माध्यमातून एकाच छताखाली शेकडो नागरिकांना विविध दाखल्यांचे आणि शासकीय योजनांच्या लाभाचे वाटप करण्यात आले.

शासकीय कामात पारदर्शकता आणि वेग आणण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली व महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या संकल्पनेतून हे अभियान आयोजित करण्यात आले आहे. खर्डी येथील दिलीप विनायक अधिकारी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात हे शिबीर पार पडले. या प्रसंगी ठाणे जिल्हाधिकाऱ्यांच्या वतीने निवासी नायब तहसीलदार शंकर डामसे आणि नायब तहसीलदार दत्तात्रय बांबळे यांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून नागरिकांशी संवाद साधला.

या शिबिरामध्ये डिजिटल सात-बारा उताऱ्यांपासून ते विविध निवृत्तीवेतन योजनांपर्यंत अनेक कामांचा निपटारा करण्यात आला. यामध्ये प्रामुख्यानेः डिजिटल ७/१२ व ८-अ उताराः ९१० लाभार्थ्यांना वाटप. दाखलेः ३४३ नागरिकांना उत्पन्न प्रमाणपत्र, तर जातीचे व अधिवास प्रमाणपत्रांचेही वितरण. सामाजिक न्याय योजनाः संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ योजना आणि इंदिरा गांधी राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेच्या लाभार्थ्यांना मंजुरी पत्रे देण्यात आली. आधार कार्ड नोंदणी, नवीन शिधापत्रिका आणि आयुष्मान भारत कार्डाचे वितरण करण्यात आले.

या कार्यक्रमाला खडीचे माजी सरपंच श्री. दिलीप अधिकारी, प्रतिष्ठित नागरिक श्री. फारूक मेमन, उपअधीक्षक भूमी अभिलेख शरद काळे, मंडळ अधिकारी अजय आरबाड यांच्यासह खर्डी महसूल मंडळातील सर्व तलाठी (ग्राम महसूल अधिकारी) व विविध विभागांचे शासकीय कर्मचारी उपस्थित होते.

"सामान्य जनतेच्या शासकीय कामांमधील अडचणी दूर करून, त्यांना कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागू नयेत, यासाठी हे समाधान शिबीर प्रभावी ठरले आहे. एकाच ठिकाणी सर्व दाखले मिळाल्याने ग्रामस्थांचा वेळ आणि पैसा दोन्हीची बचत झाली आहे."

थोडक्यात आकडेवारी :

- एकूण निकाली प्रकरणेः १७६४,
- डिजिटल ७/१२: ७६३,
- उत्पन्न प्रमाणपत्रेः ३४३,
- शिधापत्रिका कामेः ४५,
- आधार कार्ड दुरुस्तीः २०

कसारा येथे 'महाराजस्व समाधान शिबिरा'ला नागरिकांचा मोठा प्रतिसाद

1217 दाखले व सेवांचे जागेवरच वाटप

■ठाणे। प्रतिनिधी,

राज्य शासनाच्या लोकाभिमुख धोरणांतर्गत, महसूल व वन विभागाच्या वतीने संपूर्ण महाराष्ट्रात 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान (टप्पा क्र. १)' राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत शहापूर तालुक्यातील कसारा महसूल मंडळासाठी अग्रवाल विद्यालय, कसारा येथे भव्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात तालुक्यातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी व लोकप्रतिनिधींनी नागरिकांशी थेट संवाद साधत एकूण १,२१७ विविध शासकीय दाखले, प्रमाणपत्रे आणि योजनांच्या लाभांचे जागेवरच वाटप केले.

या प्रसंगी ठाणे जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, स्थानिक आमदार श्री. दौलत दरोडा, उपविभागीय अधिकारी अमित सानप आणि शहापूरचे तहसीलदार परमेश्वर कासुळे यांनी शिबिराला प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली. उपस्थित मान्यवरांनी नागरिकांना या अभियानाचे महत्त्व पटवून देत शासकीय योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाला कसारामधील सरपंच प्रकाश बीर, उपसरपंच शरद वेखंडे, निवासी नायब तहसीलदार शंकर डामसे, नायब तहसीलदार सदानंद घुटे, महसूल नायब तहसीलदार दत्तात्रय बांबळे, उपअधीक्षक भूमी अभिलेख शरद काळे, कसारा मंडळाच्या अधिकारी श्रीमती प्रतिभा चव्हाण तसेच कसारा महसूल मंडळातील सर्व ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) व विविध विभागांचे शासकीय कर्मचारी उपस्थित होते.

शिबिरादरम्यान ग्रामीण भागातील शेतकरी, महिला, विद्यार्थी आणि सर्वसामान्य नागरिकांना खालीलप्रमाणे सेवांचे वाटप करण्यात आलेः

डिजिटल ७/१२ व ८-अ उताराः ३९५ नागरिकांना वाटप. अद्यावत महसूल अभिलेखः जिवंत ७/१२ मोहिमेअंतर्गत २५६ लाभार्थ्यांना अद्यावत अभिलेख उपलब्ध करून देण्यात आले. प्रमाणपत्रेः ३२५ नागरिकांना उत्पन्न प्रमाणपत्र, २७ जणांना नॉन-क्रीमीलेअर, २ष जणांना जातीचे प्रमाणपत्र, १५ नागरिकांना अधिवास (डोमिसाईल) आणि १० जणांना रहिवासी प्रमाणपत्र देण्यात आले. रेशनिंग व शासकीय नोंदणीः १०२ नागरिकांना नवीन शिधापत्रिका (रेशन कार्ड) किंवा शिधापत्रिकेत नाव वाढवून देण्यात आले, तर १२ नागरिकांच्या आधार कार्डची नोंदणी व दुरुस्ती संबंधित कामे पूर्ण करण्यात आली. सामाजिक योजना व इतरः संजय गांधी निराधार अनुदान योजनेअंतर्गत ३५ लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला, तसेच इतर योजना व ई-मोजणीची १७ प्रकरणे निकाली काढण्यात आली.

महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या शासन निर्णयानुसार मार्च ते मे २०२६ या कालावधीत हे अभियान संपूर्ण राज्यात तीव्र (क्ल्लशील्ल२५ी) स्वरूपात राबविले जात आहे. महसूल विभागातील विविध कल्याणकारी सुधारणांचा लाभ शहरी व ग्रामीण भागातील शेवटच्या घटकांपर्यंत पारदर्शक व गतीने पोहोचवणे हाच या अभियानाचा मुख्य उद्देश असल्याचे तहसीलदार परमेश्वर कासुळे यांनी सांगितले.

थोडक्यात आकडेवारी :

- एकूण निकाली काढलेली प्रकरणेः १२१७,
- डिजिटल ७/१२ वाटपः ३५०,
- उत्पन्न प्रमाणपत्रेः ३२५,
- शिधापत्रिका (नवीन/नाव वाढवणे): १०२

मुंबई, ठाणे, रायगडला आयएमडीचा यलो अलर्ट जारी

■मुंबई । प्रतिनिधी,

उद्यापासून मुंबई, ठाणे, रायगड आणि पालघरमध्ये उष्णतेच्या लाटेचा मोठा इशारा देण्यात आला. भारतीय हवामान विभागाचा यलो अलर्ट जारी केला. मुंबईत तापमान 36 अंश सेल्सिअसपर्यंत जाण्याची शक्यता आहे. ठाण्यात काही भागांत तापमान 38 अंशांच्या पुढे जाण्याचा अंदाज आहे. शुक्रवार आणि शनिवार रायगड-ठाण्यात उष्णतेची तीव्रता अधिक राहणार आहे. गेल्या आठवड्यातही मुंबई महानगर क्षेत्रात तीव्र उकाड्याची नोंद झाली. बुधवारी तापमान 34 अंशांवर आल्याने काहीसा दिलासा मिळाला होता. मात्र आज शुक्रवारपासून पुन्हा तापमान वाढण्याचा अंदाज आहे. 18 मेनंतर ठाण्यात हलक्या पावसासह मेघगर्जनेची शक्यता आहे. मुंबईत मात्र कोरडे हवामान आणि निरभ्र आकाश राहण्याचा अंदाज. दुपारच्या वेळेत थेट उन्हात जाणे टाळा असा थेट सल्ला भारतीय हवामान विभागाने दिलाय. बाहेर काम करणाऱ्यांनी पुरेसे पाणी प्या आणि वारंवार विश्रांती घ्या, असेही सांगण्यात आले. मुंबईतील मे महिन्यातील उच्चांकी तापमान 12 मे 1979 रोजी 41 अंश सेल्सिअस नोंदले गेले होते. आता मुंबईच्या तापमानात वाढ होताना दिसत आहे. नंदुरबारमध्ये तापमान 41 अंशांवर स्थिर असल्याने नागरिकांना काहीसा दिलासा मिळाला. मात्र, आद्रता कमी असल्याने उकाडा कायम असून रस्त्यांवर सकाळपासून शुकशुकाट बघायला मिळतोय. अत्यावश्यक कामांशिवाय नागरिक घराबाहेर पडणे टाळत आहेत. उष्माघात टाळण्यासाठी जिल्ह्यातील नगरपालिका आणि ग्रामपंचायतमध्ये उष्माघात कक्ष स्थापन करण्याचे आदेश. देण्यात आले नंदुरबार जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून उष्णतेचा कहर कायम असतानाच, आता तापमानात काहीशी घट झाल्याने नागरिकांना थोडासा दिलासा मिळाला आहे. गेल्या दोन दिवसांपासून जिल्ह्याचे तापमान 41 अंश सेल्सिअसवर स्थिर असून, यापूर्वी या आठवड्यात तापमानाचा पारा तब्बल 45 अंशांपर्यंत पोहोचला होता. तापमानात घट झाली असली तरी हवेत आद्रतेचे प्रमाण कमी असल्याने उकाडा कायम असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. सकाळच्या सत्रातही रस्त्यांवर शुकशुकाट दिसून येत असून, नागरिक अत्यावश्यक कामांशिवाय घराबाहेर पडणे टाळत आहेत. हवामान खात्याने पुढील काही दिवस तापमान 41 अंशांच्या आसपासच राहण्याचा अंदाज व्यक्त केला आहे.

'एमआय इंटेलिजन्स लॅब्ज'सोबत राज्याचा १.१४ लाख कोटींचा करार

मुंबईत सर्वात मोठे 'एआय कॉम्प्युट सेंटर', ८ हजार रोजगार निर्मिती

■मुंबई । प्रतिनिधी,

महाराष्ट्र सरकारने मुंबई क्षेत्रात एकात्मिक ग्रीन डाटा सेंटर पार्क आणि 'एआय कॉम्प्युट हब' स्थापन करण्यासाठी 'एमआय इंटेलिजन्स लॅब्ज प्रायव्हेट लिमिटेड' कंपनीसोबत १ लाख १४ हजार कोटी रुपयांच्या प्रस्तावित गुंतवणुकीचा सामंजस्य करार केला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत या करारावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या.

नूतनीकरणक्षम ऊर्जेवर आधारित असलेल्या या प्रकल्पामुळे उच्च तंत्रज्ञान क्षेत्रात सुमारे ८ हजार प्रत्यक्ष आणि अनेक अप्रत्यक्ष नोकऱ्या निर्माण होण्याची अपेक्षा आहे. इंजिनिअर्स, डाटा सायंटिस्ट आणि ऑपरेशन्स कर्मचाऱ्यांना मोठी संधी मिळणार आहे. तसेच बांधकाम कालावधीत सुमारे २



हजार अतिरिक्त रोजगार संधी निर्माण होतील, अशी माहिती देण्यात आली.

'एआय' क्षेत्रात राज्याला अग्रेसर करण्याचे ध्येय

हा प्रकल्प महाराष्ट्राच्या 'माहिती तंत्रज्ञान धोरण २०२३' आणि 'ग्रीन इंटिग्रेटेड डाटा सेंटर पार्क धोरण २०२४'अंतर्गत विकसित केला जाईल. या उपक्रमामुळे महाराष्ट्राला कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात एआय आणि डिजिटल पायाभूत सुविधांमध्ये राष्ट्रीय तसेच जागतिक स्तरावर आघाडीचे स्थान मिळवून देणे हे सरकारचे मुख्य ध्येय आहे.

बनावट प्रमाणपत्र प्रकरणात गुन्हे तत्काळ दाखल करा, महापौर रितू तावडेंचे निर्देश

८७ हजार अवैध जन्म प्रमाणपत्रांचा घोटाळा उघड, चौकशीसाठी रकळ स्थापन

■मुंबई । प्रतिनिधी,

मुंबई महानगरपालिकेतून अवैधरीत्या जारी करण्यात आलेल्या हजारो जन्म व जात प्रमाणपत्रांच्या प्रकरणात महापौर रितू तावडे यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. बनावट प्रमाणपत्रांच्या आधारे मुंबईत अवैध घुसखोरी करणाऱ्यांवर तसेच त्यांना सहकार्य करणाऱ्या अधिकाऱ्यांवर तत्काळ गुन्हे दाखल करण्याचे निर्देश महापौर रितू तावडे यांनी पालिका प्रशासनाला दिले आहेत.

भाजप नेते किरिट सोमय्या यांनी उघड केलेल्या या घोटाळ्याचे स्वरूप दिवसेंदिवस व्यापक होत असून, सखोल



चौकशीसाठी विशेष तपास पथक (एसआयटी) स्थापन करण्यात आली आहे. गेल्या तीन वर्षांपासून सोमय्या हा मुद्दा सातत्याने मांडत आहेत. तपासादरम्यान पालिकेच्या २६ विभागांतून एकूण ८७,३४७ अवैध जन्म प्रमाणपत्रे जारी झाल्याचे समोर आले आहे. या प्रकरणात बांगलादेशी घुसखोरांचा सहभाग असल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

विशेषतः ई-वॉर्ड, एल-वॉर्ड, भायखळा, गोवंडी आणि देवनार परिसरात मोठ्या प्रमाणावर अशी प्रमाणपत्रे दिल्याचे निष्पन्न झाले आहे. प्रकरणाच्या गांभीर्याची दखल घेत महापौरांनी आरोग्य विभागातील काही जुन्या अधिकाऱ्यांचे बदली करून नव्या नियुक्त्या करण्याचे निर्देश दिले आहेत. बनावट जात प्रमाणपत्र प्रकरणात आतापर्यंत ११९ जणांवर कारवाई करण्यात आली असून, संबंधित बनावट नावे पोर्टलवरून हटवण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

''दोषी अधिकाऱ्यांना कोणत्याही परिस्थितीत पाठीशी घातले जाणार नाही,'' असा इशारा महापौरांनी दिला.

बेपत्ता तरुणाचा शोध घेताना धक्कादायक उलगडा... अरबाज आणि महजबीन यांच्या लोकेशनमुळे सत्य उघड

■ठाणे। प्रतिनिधी,

उत्तर प्रदेशातील गाजलेल्या मेरठ ड्रम हत्याकांडासारखीच एक थरारक आणि धक्कादायक घटना ठाण्यातील मुंब्रा परिसरात उघडकीस आली आहे. प्रेयसीनंच आपल्या पती आणि भावाच्या मदतीनं प्रियकराची हत्या करून मृतदेह ड्रममध्ये भरत त्याची विल्हेवाट लावण्याचा प्रयत्न केल्याची माहिती समोर आली आहे.

ड्रम हत्याकांडानं महाराष्ट्र हादरला आहे. मुंब्रा इथं प्रेयसीनं पती आणि भावासोबत मिळून प्रियकराची हत्या केली आहे. मुंब्रा परिसरातील बेपत्ता युवकाची त्याच्या प्रेयसीनं पती, भाऊ आणि मित्राच्या मदतीनं हत्या करून मृतदेह ड्रममध्ये भरून फेकल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी पोलिसांनी प्रेयसी आणि तिच्या भावाला अटक केली आहे तर, पती आणि मित्र फरार झाले आहेत.

१ कोटी रुपयांचा जीवन विमा @ 440 स्र्े..

कऊकऊक ढ१४ छी क्लल२४१ल्ली ढ'ल्ल

मुंब्रा परिसरात राहणारा अरबाज मकसूद अली खान हा 3 एप्रिल 2026 रोजी घरातून बाहेर पडला होता. दादर इथं पैसे घेण्यासाठी जात असल्याचं सांगून तो घरातून निघाला. मात्र त्यानंतर तो परतलाच नाही. बराच वेळ संपर्क न झाल्यानं कुटुंबीयांनी शोधाशोध सुरू केली.



मात्र काहीच माहिती न मिळाल्यानं अखेर मुंब्रा पोलीस ठाण्यात बेपत्ता असल्याची तक्रार दाखल करण्यात आली.

प्रकरणाचं गांभीर्य लक्षात घेता पोलिसांनी तातडीनं तपासाची सूत्रं हलवली. अरबाजच्या मोबाईल कॉल डिटेल्स आणि लोकेशनचा तपास करण्यात आला. या तपासादरम्यान अरबाज आणि त्याची प्रेयसी महजबीन यांचं शेवटचं लोकेशन पालघर जिल्ह्यातील बोईसर परिसरात आढळून आलं. त्यानंतर पोलिसांचा संशय अधिक बळावला. पोलिसांनी महजबीनला ताब्यात घेत चौकशी केली असता धक्कादायक माहिती समोर आली. महजबीन हिनं आपल्या पती आणि भावाच्या मदतीनं अरबाजची हत्या केल्याची कबुली दिली. प्राथमिक तपासात फिरौतीच्या पैशांवरून दोघांमध्ये वाद झाल्याचं समोर आलं असून त्यातूनच ही हत्या करण्यात आल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

हत्या केल्यानंतर आरोपींनी पुरावे नष्ट करण्यासाठी मृतदेह ड्रममध्ये भरून त्याची विल्हेवाट लावण्याचाही प्रयत्न केला. मात्र पोलिसांच्या तपासामुळे संपूर्ण कट उघडकीस आला. या घटनेमुळे मुंब्रा परिसरात मोठी खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण निर्माण झालं आहे. सध्या पोलिसांनी महजबीनसह तिच्या पती आणि भावाला ताब्यात घेत पुढील तपास सुरू केला आहे. या प्रकरणात आणखी कोणाचा सहभाग आहे का, याचाही तपास पोलीस करत आहेत.

प्रेमसंबंध, पैशांचा वाद आणि त्यातून घडलेली थरारक हत्याङ्कमेरठनंतर आता ठाण्यात उघडकीस आलेल्या या ड्रम हत्याकांडानं पुन्हा एकदा ठाणे हादरलंय.



संपादकीय

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

सोन्याची कुऱ्हाड प्रत्येकाला हवी

घरातील सन्मान, पिढ्यानपिढ्या जपलेली परंपरा, संकटात आधार देणारी संपत्ती आणि भावनिक जिव्हाळ्याची ओळख म्हणून भारतात सोन्याकडे पाहिलं जातं. पण आज परिस्थिती वेगळी आहे. केंद्र सरकारने सोन्या-चांदीवरील आयात शुल्कात मोठी वाढ केल्यानंतर आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पुढील वर्षभर सोने खरेदी टाळण्याचे आवाहन केल्यानंतर देशातील सोन्याच्या बाजारपेठेत निर्माण झालेली अस्थिरता एका नव्या वास्तवाची चाहूल देत आहे. ज्या सोन्याला भारतीय समाजाने शतकानुशतके देवत्व दिलं, त्याच सोन्याभोवती आता प्रश्नचिन्हांचं वलय निर्माण होऊ लागलं आहे. भारतात सोनं हे नेहमीच संपत्तीचं आणि सुरक्षिततेचं प्रतीक राहिलं आहे.

एखाद्या घरातील स्त्रीच्या अंगावर किती सोनं आहे, यावर त्या कुटुंबाची आर्थिक ताकद मोजली जायची. ग्रामीण भागात बँका नव्हत्या, गुंतवणुकीचे पर्याय नव्हते, शेअर बाजाराची माहिती नव्हती. त्या काळात सोनं म्हणजे संकटात उपयोगी पडणारा साथीदार होता. दुष्काळ असो, आजारपण असो किंवा मुलीचं लग्न असो सोनं विकून संसार वाचवण्याची परंपरा भारतीयांनी अनुभवली आहे. त्यामुळे सोनं ही भावनिक विमा पॉलिसी होती. विशेषतः लग्नसराईत सोन्याचं महत्त्व तर भारतीय संस्कृतीत अभूतपूर्व आहे. मुलीच्या लग्नात सोनं देणं म्हणजे तिच्या भविष्यासाठीची सुरक्षा मानली जाते. लग्नाच्या निमंत्रणाइतकंच सोन्याच्या खरेदीचं नियोजन घराघरात केलं जातं. दक्षिण भारतात तर सोन्याचं प्रदर्शन ही प्रतिष्ठेची बाब बनली आहे. अनेक कुटुंबं वर्षानुवर्षे बचत करून केवळ मुलीच्या लग्नासाठी सोनं साठवत असतात. त्यामुळे सोन्याच्या किमती वाढल्या की सर्वसामान्यांच्या संसाराच्या गणितात थेट बदल होतो. आता सरकारने आयात शुल्क सहा टक्क्यांवरून थेट पंधरा टक्क्यांपर्यंत वाढवलं आहे. त्यात दहा टक्के मूलभूत सीमा शुल्क आणि पाच टक्के कृषी पायाभूत सुविधा व विकास उपकर यांचा समावेश आहे. हा निर्णय केवळ महसूल वाढवण्यासाठी नाही, तर देशातून होणारा परकीय चलनाचा मोठा ओघ रोखण्यासाठी असल्याचं मानलं जात आहे. भारत हा जगातील सर्वात मोठ्या सोन्याच्या ग्राहकांपैकी एक देश आहे. दरवर्षी प्रचंड प्रमाणात सोन्याची आयात होते आणि त्यामुळे देशाच्या व्यापार तुटीत वाढ होते. सरकारला वाटतं की, लोकांनी सोन्यावरचा अतिरेकी भर कमी करून उत्पादनक्षम क्षेत्रात गुंतवणूक करावी. पंतप्रधान मोदींचं आवाहनही त्याच आर्थिक विचारसरणीचा भाग मानलं जात आहे. मात्र भारतीय मानसिकता इतक्या सहज बदलणारी नाही. कारण सोन्याशी भारतीयांचं नातं केवळ अर्थकारणावर आधारलेलं नाही. ते संस्कृतीशी, धमार्शी आणि सामाजिक प्रतिष्ठेशी जोडलेलं आहे. अक्षय तृतीया, धनत्रयोदशी, दिवाळी, लग्नसमारंभ, बारसं, मुंज अशा प्रत्येक शुभ कार्यात सोन्याचा स्पर्श अपरिहार्य मानला जातो. त्यामुळे सरकारचं आवाहन आणि वाढलेलं आयात शुल्क हे व्यावहारिकदृष्ट्या योग्य असलं, तरी त्याचा सामाजिक पातळीवर स्वीकार कितपत होईल, हा मोठा प्रश्न आहे. सध्या बाजारात दिसणारी घबराट याच मानसिक संघषार्चं प्रतीक आहे. आयात शुल्क वाढीची घोषणा होताच मल्टी कमोडिटी एक्सचेंजवर सोन्या-चांदीच्या फ्युचर्समध्ये प्रचंड उसळी दिसली. काही तासांतच सोन्याचे दर दहा ग्रॅममागे हजारोंनी वाढले. चांदीनेही विक्रमी झेप घेतली. याचा थेट परिणाम ग्राहकांवर झाला. ज्या कुटुंबांनी लग्नासाठी सोनं खरेदी करण्याचं नियोजन केलं होतं, त्यांचं बजेट अचानक कोलमडलं. अनेकांनी खरेदी पुढे ढकलली, तर काहींनी कमी वजनाचे दागिने घेण्याचा निर्णय घेतला. याचा परिणाम ज्वेलरी उद्योगावरही दिसू लागला आहे. कल्याण ज्वेलर्स आणि टायटनसारख्या मोठ्या कंपन्यांच्या शेअर्समध्ये घसरण झाली. गुंतवणूकदारांना भीती आहे की, वाढलेल्या किमतींमुळे ग्राहकांची मागणी कमी होईल. भारतीय ग्राहक भावनिक असला, तरी तो किंमत-संवेदनशीलही आहे. सोनं महागलं की खरेदी लांबवण्याची प्रवृत्ती वाढते. विशेषतः मध्यमवर्गीय आणि ग्रामीण ग्राहक खचार्चा फेरविचार करू लागतात. यामध्ये आणखी एक महत्त्वाचा घटक म्हणजे जागतिक अर्थव्यवस्था. अमेरिकेतील महागाई वाढल्यामुळे तेथील केंद्रीय बँकेकडून व्याजदर कपातीची शक्यता कमी झाली आहे. त्यामुळे जागतिक बाजारात अस्थिरता वाढली आहे. अशा परिस्थितीत सोनं हे सुरक्षित गुंतवणुकीचं साधन मानलं जातं. परिणामी आंतरराष्ट्रीय स्तरावरही सोन्याच्या किमती वाढत आहेत. भारतातील आयात शुल्क वाढ आणि जागतिक अनिश्चितता यांचा दुहेरी परिणाम भारतीय बाजारावर होत आहे. पण या सगळ्यात एक मोठा बदल हळूहळू घडताना दिसतो आहे. नवीन पिढीचा सोन्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलत आहे. पूर्वी सोनं म्हणजे भविष्यातील एकमेव सुरक्षित गुंतवणूक मानली जायची. आता तरुण पिढी म्युच्युअल फंड, शेअर बाजार, डिजिटल गुंतवणूक आणि स्थावर मालमत्ता याकडे अधिक आकर्षित होत आहे. लग्नातही पारंपरिक सोन्याच्या दागिन्यांऐवजी हलक्या, आधुनिक डिझाईनची मागणी वाढते आहे. सरकारलाही हाच बदल अपेक्षित आहे. जर लोकांनी सोन्यावरचा अतिरेकी भर कमी केला, तर देशातील बचत अधिक उत्पादनक्षम क्षेत्रात वळू शकते. उद्योग, पायाभूत सुविधा आणि रोजगारनिर्मिती यांना चालना मिळू शकते. थोडक्यात, एकेकाळी सुरक्षिततेचं अंतिम प्रतीक मानलं जाणारं सोनं आता सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर जाऊ लागलं आहे. अशा वेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेलं पुढील वर्षभर सोने खरेदी टाळण्याचं आवाहन म्हणजे या बदलत्या परिस्थितीवरचं सोने पे सुहागा ठरत आहे. पण हा बदल एका आवाहनाने घडणार नाही. हा बदल घडवण्यासाठी आर्थिक पयार्यांवर विश्वास निर्माण करावा लागेल. ग्रामीण भारतात अजूनही बँकिंग आणि आर्थिक साक्षरतेची कमतरता आहे. अनेक महिलांसाठी सोनं हीच त्यांची स्वतंत्र मालमत्ता असते. शेअर बाजारातील चढ-उतार समजून घेण्यापेक्षा सोनं हातात धरणं त्यांना अधिक सुरक्षित वाटतं. त्यामुळे सोनं खरेदी टाळा असं सांगणं सोपं असलं, तरी त्यासाठी विश्वासार्ह पर्याय उभे करणं अधिक महत्त्वाचं आहे. कारण सोन्याची कुर्हाड प्रत्येकालाच हवी असते, पण याचवेळी वस्तुस्थितीचीही जाणीव ठेवायला हवी.

बंगाल पॅटर्न देशाला कुठे घेऊन जाणार?



आज प्रश्न केवळ एका राज्याचा नाही. ह्यबंगाल पॅटर्नह्ल ही जर भविष्यातील निवडणुकांची नवी कार्यपद्धती बनू लागली, तर देशाला अराजकतेकडे जाण्यापासून कोणीही रोखू शकणार नाही. हे सर्व लोकशाहीला आतून पोखरणारे घटक आहेत. नुकत्याच पार पडलेल्या पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकांचे निकाल जाहीर झाले आणि देशभरात नेहमीप्रमाणे विजयोत्सव, पराभवाची चर्चा आणि राजकीय विश्लेषणांचे वादळ सुरू झाले. पण या वेळची निवडणूक केवळ सत्तांतराची किंवा पक्षांच्या विजय-पराभवाची कथा राहिलेली नाही.

या निवडणुकांनी भारतीय लोकशाहीच्या मूलभूत प्रक्रियेवरच गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे. मतदानाचा हक्क, निवडणूक आयोगाची निष्पक्षता, प्रशासनाची भूमिका आणि लोकशाही संस्थांवरील जनतेचा विश्वास हे सर्वच आज कसोटीवर उभे आहेत.

रक्फने फिक्स केलेली निवडणूक

लोकशाही मतदारांच्या विश्वासावर टिकून असते. पण जेव्हा मतदार यादी पुनरीक्षणाच्या (रक्फ) नावाखाली एका राज्यातील ९० लाख मतदारांची नावे यादीतून वगळून त्यांना मतदान करू दिले जात नाही तेव्हा लोकशाहीच्या पायाभूत रचनेलाच तडा जाऊ लागतो. बंगालमधील १५० जागांवर विजय-पराजयातील फरक हा मतदार याद्यांतून वगळलेल्या मतदारांच्या संख्येपेक्षा कमी होता. या १५० पैकी भाजपने ९९ जागा जिंकल्या आहेत, तर २०२१ मध्ये यातील फक्त १९ जागांवर भाजप विजय मिळवू शकला होता. म्हणजेच मतदार वगळल्याने भाजपला तब्बल ८० जागांचा फायदा झाला. म्हणजेच जर हे मतदार कापले गेले नसते, तर भाजपचा विजय शक्य झाला नसता. या निवडणुकीत तृणमूल कॉंग्रेसने १२९ जागा गमावल्या. यापैकी ह्यस्विंग सीट्सह्ल पाहिल्यास ८६ अशा जागा आहेत जिथे भाजपच्या विजयाचा फरक हा कापलेल्या मतांपेक्षाही कमी आहे.

भयग्रस्त वातावरण

निवडणूक प्रक्रियेतील दुसरी धक्कादायक बाब म्हणजे निवडणुकीदरम्यान निर्माण केलेले भयाचे वातावरण. पश्चिम बंगालमध्ये अडीच लाखांहून अधिक केंद्रीय सुरक्षा दल तैनात करण्यात आले. काही भागांत रस्त्यांवर रणगाडे आणि बख्तरबंद वाहने उतरवली गेली. मतदानाचा उत्सव असलेल्या प्रक्रियेला युद्धजन्य वातावरणाचे स्वरूप देण्यात आले. मतदारांच्या मनात विश्वासाऐवजी भीती निर्माण झाली. लोकशाहीत नागरिक मतदान केंद्रावर आत्मविश्वासाने जातो; परंतु जेव्हा प्रत्येक चौकात बंदुका, सशस्त्र जवान आणि धाकाचे वातावरण दिसते, तेव्हा मतदान ही लोकशाही प्रक्रिया न राहता नियंत्रणाखालील कृती वाटू लागते. अशा परिस्थितीत मतदार खरोखर स्वतंत्रपणे मतदान करतो का, हा प्रश्न अनिवार्यपणे उभा राहतो.

हिंसाचाराचा पॅटर्न

पश्चिम बंगालमध्ये भाजपच्या विजयानंतर प्रचंड हिंसाचार सुरू आहे. या हिंसाचारात काही जणांचा मृत्यू झाला आहे. तृणमूल कॉंग्रेसची कार्यालये, अल्पसंख्यांक समाजाच्या लोकांची घरे, दुकाने बुलडोझर लावून पाडली जात आहेत, जाळपोळ सुरू आहे. हे सर्व पोलीस आणि केंद्रीय सुरक्षा बलाच्या उपस्थितीत सुरू आहे. तृणमूल कॉंग्रेसच्या महिला नेत्या आणि कार्यकर्त्यांना घेराव घालून भाजपचे कार्यकर्ते शिवीगाळ, धक्काबुक्की आणि त्यांच्या मनात लज्जा निर्माण होईल अशी कृत्ये करत असल्याचे हजारो व्हिडीओ निदर्शनास आले आहेत. सुरक्षादर्शक मूकदर्शक झाले आहेत. आता ही परिस्थिती आहे पुढची पाच वर्षे बंगालची परिस्थिती कशी असेल याची कल्पनाच न केलेले बरी.

धर्मांध विखारी प्रचार

या निवडणुकांमध्ये प्रचाराची पातळीही अभूतपूर्वरीत्या खालावलेली दिसली. पश्चिम बंगाल आणि आसाममध्ये उघडपणे धर्माच्या नावावर मते मागितली गेली. भाजप नेत्यांकडून ध्रुवीकरणासाठी धमक्या, द्वेष आणि अल्पसंख्यांकांना लक्ष्य करणारी वक्तव्ये सातत्याने करण्यात आली. संविधानाने दिलेल्या धर्मनिरपेक्षतेच्या तत्त्वालाच उघडपणे आव्हान दिले गेले. परंतु निवडणूक आयोगाने एकाही भाजप नेत्यावर कारवाई केली नाही. आदर्श आचारसंहिता ही केवळ कागदावरील संकल्पना बनल्याचे चित्र दिसले.

विखारी धर्मांध विचारांना दक्षिणेत स्थान नाही

तमिळनाडू आणि केरळ या दोन्ही राज्यांतील एकूण ३७४ जागांपैकी भाजप फक्त चार जागांवर विजय मिळवू शकला. म्हणजेच हे प्रमाण फक्त १ टक्का आहे. २०१४ पासून सातत्याने साम-दाम-दंड-भेद, सत्ता आणि पैशाचा प्रचंड गैरवापर. राज्यपालांच्या माध्यमांतून प्रादेशिक पक्षांची अडवणूक. द्वेषाची पेरणी करण्याचा प्रयत्न करूनही दक्षिण भारताने भाजपच्या धर्मांध राजकारणाला स्पष्टपणे नाकारले आहे. त्यामुळेच तमिळनाडू आणि केरळ या दोन राज्यांत सत्तांतर होऊनही हिंसाचाराची एकही घटना समोर आली नाही.

सर्वधर्म समभावाचे प्रतीक केरळ

राजकीय फायद्यासाठी भाजपने फेक नरेटिव्ह पसरवण्यासाठी केरळा स्टोरीसारख्या विखारी धर्मांध सिनेमाचे उदात्तीकरण करण्याचा प्रयत्न केला, पण केरळच्या जनतेने भाजपचा हा कुटील डाव हाणून पाडला. या विधानसभा निवडणुकीत मुस्लिमबहुल थवनूर मतदारसंघातून खिश्चन उमेदवार व्ही. एस. जॉय विजयी झाले; हिंदूबहुल कलमासेरी मतदारसंघातून मुस्लिम उमेदवार व्ही. ई. अब्दुल गफूर निवडून आले; तर खिश्चनबहुल कोची मतदारसंघातून मुस्लिम उमेदवार मोहम्मद शियास विजयी झाले. उत्तरेत धर्मांध राजकारणाची पकड घट्ट होत असताना केरळाने सामाजिक सलोख्याचे आणि बंधुभावाचे आदर्श उदाहरण घालून दिले आहे, हीच खरी केरळा स्टोरी आहे.

हिंदू एकजुटीच्या नावाखाली मुस्लिम द्वेषाचे नरेटिव्ह

पश्चिम बंगाल आणि आसाममध्ये निर्भय, निष्पक्ष आणि पारदर्शक वातावरणात निवडणुका झाल्या नाहीत, पण त्यावर पडदा टाकण्यासाठी हिंदूंची एकजूट झाली. सर्व हिंदूंनी भाजपला मतदान केले. फक्त मुस्लिमांनी तृणमूल आणि कॉंग्रेसला मतदान केले, असे फेक नरेटिव्ह भाजपकडून पसरवले जात आहे. दुर्दैवाने स्वतःला बुद्धिजीवी आणि पत्रकार म्हणवून घेणारेही काहीजण याला बळी पडून भाजपच्या अपप्रचाराला पुढे घेऊन जात आहेत. पश्चिम बंगालमध्ये २७% आणि आसाममध्ये ३४% टक्के मुस्लिम लोकसंख्या आहे, तरीही भाजपने एकाही मुस्लिम उमेदवाराला उमेदवारी दिली नाही. उलट कॉंग्रेसने ९९ पैकी ६९ हिंदूंना आणि २० मुस्लिम उमेदवारांना संधी दिली. म्हणून खरा प्रश्न भाजपला विचारला गेला पाहिजे, की तुम्ही एका विशिष्ट धमार्तील नागरिकांना निवडणूक प्रक्रियेतून दूर का ठेवत आहात? पण तो विचारण्याची हिंमत आणि नैतिकता राहिली नसल्याने भाजपच्या स्लीपर सेलचे हस्तक मुस्लिमांना तिकीट का दिले? म्हणून बोंबाबोंब करत आहेत. धर्माच्या आधारावर लोकांना विभागणे म्हणजेच देशाला विभागणे होय याचे भान या लोकांना राहिले नाही हे दुदैर्वी आहे.

बंगाल पॅटर्नला रोखले पाहिजे

आज प्रश्न केवळ एका राज्याचा नाही. ह्यबंगाल पॅटर्नह्ल ही जर भविष्यातील निवडणुकांची नवी कार्यपद्धती बनू लागली, तर देशाला अराजकतेकडे जाण्यापासून कोणीही रोखू शकणार नाही. मतदार यादीतून नावे वगळणे, प्रशासनाचा गैरवापर करणे, केंद्रीय यंत्रणांचा दबाव निर्माण करणे, धमार्धारित प्रचार आणि भीतीचे वातावरण हे सर्व लोकशाहीला आतून पोखरणारे घटक आहेत. आज गरज आहे ती निवडणूक प्रक्रियेच्या व्यापक पुनर्मूल्यांकनाची. निवडणूक आयोगाने आपली स्वायत्तता केवळ शब्दांत नव्हे तर कृतीत सिद्ध केली पाहिजे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, प्रत्येक नागरिकाचा मतदानाचा हक्क अबाधित राखला पाहिजे.

ही लढाई कोणत्या पक्षाच्या विजयाची किंवा पराभवाची नाही. ही लढाई भारतीय लोकशाहीच्या अस्तित्वाची आहे. कारण लोकशाही केवळ संविधानाच्या पानांवर नसते; ती जनतेच्या मनातील विश्वासावर उभी असते आणि तो विश्वास जर ढासळला, तर कोणतीही व्यवस्था टिकू शकत नाही.

नीटच्या गोंधळावर व्यावहारिक उतारा



ह्यनीट एलिजिबलह्ल होणा[]यांची संख्या कायम परीक्षा देणा[]यांच्या जेमतेम निम्मी असते. तरीही अट्टाहासाने नापास होणारे किंवा एलिजिबल नसणारे विद्यार्थी पुन्हा पुन्हा बसत राहतात याला आळा बसणे गरजेचे आहे.

विद्यार्थ्यांच्या इयत्ता नववी, दहावी, अकरावी, बारावी शास्त्र, गणित आणि इंग्रजी याच्या मार्कांची सरासरी काढायची. काहींचे कदाचित अकरावी, बारावीला गणित नसेल. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी मराठी माध्यमातून शिकल्यामुळे इंग्रजी विषयाचे मार्क कमी असतील. आयसीएससीचे मार्क वाढलेले असतील किंवा सीबीएससीचे राज्य बोर्डापेक्षा कमी असतील. यातून एक गोष्ट नक्की सिद्ध होईल.

वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या लांबलचक कालावधीसाठी विद्यार्थ्यांचे सातत्य किती आहे ते कळलेलं असेल. परीक्षेत पुढचा अभ्यास करून वैद्यकीय अभ्यासक्रमात कोणाचाच निभाव लागत नाही. तो सर्व अभ्यासक्रम इंग्रजीमधून असल्यामुळे इंग्रजी मार्कही महत्त्वाचे आहेत.

वाचणे, समजून घेणे, व्यक्त होणे यासाठी मेडिकलमध्ये इंग्रजीशिवाय पर्याय नाही. यानंतरचा टप्पा म्हणजे ही सरासरी ज्यांची ८० पेक्षा जास्त आहे यांचा एक वेगळा गट करून, त्याला प्राथमिक परीक्षा द्यायची गरज राहणार नाही. इतर सर्व विद्यार्थ्यांना एक चाळणी किंवा प्राथमिक परीक्षा अत्यावश्यक असेल. चाळणी परीक्षेत ५० स्त्रीशील्ल३ी पेक्षा कमी मार्क असतील त्यांना पुन्हा नीट देण्यामधून कायम बंदी करायला हरकत नसावी. सध्या नीट किती वेळेला द्यावी? कोणी द्यावी? यावर कसलेही बंधन नाही. बारावी शास्त्रात जेमतेम ५० टक्के मार्क मिळालेला विद्यार्थी सुद्धा पाच वेळेला नीट देताना आढळतो.

कायमच ह्यनीट एलिजिबलह्ल होणा[]यांची संख्या परीक्षा देणा[]यांच्या जेमतेम निम्मी असते. तरीही अट्टाहासाने नापास होणारे किंवा एलिजिबल नसणारे विद्यार्थी पुन्हा पुन्हा बसत राहतात याला आळा बसेल. पालक व विद्यार्थी यांची निराशा थांबेल. मात्र क्लासवाल्यांची कोल्हेकुई जोरात होईल. नीटचा निकाल लागल्याच्या दुस[]या दिवशी रिपीट बॅच सुरू करणारे अनेक क्लासेस आहेत. या पद्धतीत चाळणी परीक्षा आणि खरी परीक्षा यातून चांगले डॉक्टर निर्माण होण्याची शक्यता राहील. अनेक भाबड्या पालकांच्या आणि विद्यार्थ्यांच्या माहितीसाठी काही आकडे लिहीत आहे. ७२० मार्कांची परीक्षा होते. एलिजिबिलिटीचा आकडा कायमच १२० ते १४० च्या दरम्यान राहिलेला आहे. एकूण १८० प्रश्नांपैकी ३० किंवा ३५ प्रश्नांची बरोबर उत्तरे दिली तरीही १२० ते १४० मार्क मिळतात. असे डॉक्टर समाजाला उपयोगी नाहीत हे नक्कीच सर्वांना मान्य होईल. परीक्षा खूप कठीण असते यापलीकडे विद्यार्थी आणि पालक काही बोलत नाहीत म्हणून हा आकड्यांचा खेळ कुणालाही समजावा अशा शब्दांत येथे मांडत आहे.

वेगळ्या शब्दात ह्यदूध का दूध पानी का पानीह्ल करण्यासाठी कठोर वाटला तरी हाच एक उपाय आहे. अनेक मुलांचे इयत्ता नववीचे आणि अकरावीचे मार्क ५० ते ६५% च्या दरम्यान रेंगाळत असतात, पण दहावीला हीच मुले ८०-८५ टक्के मिळाले म्हणून नीटच्या नादी लागतात. म्हणून नववी व अकरावी ही अभ्यास करण्याची वर्षे आहेत, हे पण सर्वांच्या मनावर ठसेल. ऑनलाइन परीक्षा हा उत्तम उपाय आहे. नॅशनल टेस्टिंग एजन्सीने तो मान्य केला तरीही वर लिहिलेली पद्धत जास्त उपयोगी पडेल असा माझा गेल्या ५५ वर्षांचा वैद्यकीय क्षेत्रातील अनुभव आणि करियर कौन्सिलिंगचा तीस वर्षांचा अनुभव सांगतो.

आर्थिक प्रगतीचा ढोल का फुटला?

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जनतेला काटकसरीचं आवाहन केल्यापासून देशभरात चर्चांना उधाण आलंय. सोशल मीडियावर ह्यलोका सांगे ब्रम्हज्ञानह्ल असा ट्रेंडही जोरात सुरू झालाय. नाक्यावरील कटींगच्या टपरीवर बसलेल्या सामान्यातल्या सामान्य माणसापासून ते अर्थतज्ज्ञांपर्यंत प्रत्येकजण या काटकसरीमागं लपलेला गूढ अर्थ शोधण्याचा प्रयत्न करू लागलाय. भविष्यातल्या आर्थिक संकटाची तर ही चाहूल नाही ना? भाजप वाजवत असलेला आर्थिक प्रगतीचा ढोल का फुटला, असे प्रश्न लोक उपस्थित करत आहेत.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आधी तेलंगणा आणि त्यानंतर गुजरातमध्ये लागोपाठ दोन दिवस केलेल्या भाषणातून देशवासीयांना ह्याकाटकसर हीच देशभक्तीह्ल असल्याचं म्हणत उपदेशाचे डोस पाजलेत. पेट्रोल-डिझेल, गॅस जपून वापरा, कार पुलींग करा, सार्वजनिक वाहनांचा वापर करा. वर्क फ्रॉम होम-ऑनलाईन मिटिंग्ज एवढंच नाही तर ऑनलाईन वर्ग घेण्याचं आवाहनही पंतप्रधान मोदींनी शाळांना केलंय. परंतु, सत्ताधारी मंत्री, नेते, प्रशासकीय अधिकारी, बिझनेसमन यांचा बडेजाव प्रत्यक्ष डोळ्यांनी पहात असल्यानं हे उपदेशाचे कडवट डोस सर्वसामान्यांच्या पचनी पडणं सद्यस्थितीत तरी अवघड असल्याचं दिसतंय. कारण, देशवासीयांना उद्देशून भाषण केल्याच्या दुर्दैवाच दिवशी पंतप्रधान स्वतः सोमनाथ मंदिराच्या कार्यक्रमात मोठ्या लवाजम्यासह गेले होते. तिथं त्यांनी नेहमीच्या स्टाईलनं दणकून रोड शो केल्याचंही लोकांनी पाहिलं. उत्तर प्रदेशातला भाजप नेता सौभाग्य सिंह ठाकूर पाठ्यपुस्तक मंडळाच्या अध्यक्षपदाचा पदभार स्वीकारण्यासाठी उज्जैन ते भोपाळ असा 700 गाड्यांचा ताफा घेऊन गेला. मुंबईतही भाजपचे मुंबई अध्यक्ष अमित साटम पूर्व उपनगरातल्या नालेसफाईची पाहणी करण्यासाठी 25 गाड्यांचा ताफा घेऊन गेल्याचं म्हटलं जातंय. या दोघांच्याही ताफ्याचे फोटो प्रसार माध्यमांमध्ये प्रसिद्ध झालेत. त्याचवेळी आसामच्या मुख्यमंत्र्यांच्या शपथविधीलाही केंद्रीय मंत्रिमंडळासह भाजपशासित व मित्र पक्षांच्या सरकारचे मुख्यमंत्री, इतर मंत्री व नेते मोठ्या संख्येने उपस्थित होते. काही मिनिटांच्या कार्यक्रमासाठी हे सर्वजण चार्टर्ड प्लेन व पुढे गाड्यांचा ताफा घेऊन गेले होते. स्वतः पंतप्रधान आणि सरकारमधील मंत्री, प्रशासकीय अधिकारी, नेते मंडळीच या आवाहनाला हरताळ फासत असतील, तर सर्वसामान्यांकडूनच ह्यत्यागाचीह्ल अपेक्षा का? असे प्रश्न यामुळेच उपस्थित केले जात आहेत. त्यात अर्थात चुकीचं काही नाही. याच काळात सोशल मीडियावर देशाचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू, त्यानंतर इंदिरा गांधी व लाल बहादूर शास्त्री यांनीही जनतेला उद्देशून वेळोवेळी अशी काटकसरीची आवाहने केल्याच्या पोस्ट व्हायरल होऊ लागल्या. त्यातील द हिंदूची इंदिरा गांधी यांची सोने खरेदी न करण्याची पोस्ट फॅक्ट चेकमध्ये तपासली असता फसवी निघाली.लाल बहादूर शास्त्री यांनी काटकसरीची सुरुवात स्वतःपासून केल्याचे दाखलेही पुढं आले. देशाला नुकतंच स्वातंत्र्य मिळालेलं होतं, चीन-पाकिस्तानसोबत लागोपाठ युद्ध झाली होती, उद्योगधंदे वाढीस लागायचे होते. रोजगाराचे प्रश्न होते, त्यावेळची देशाची सामाजिक-आर्थिक स्थिती वेगळी होती. भाजप कॉंग्रेसशी या पातळीवर तुलना करत असेल, तर मागच्या 12 वर्षांमध्ये आर्थिक प्रगतीच्या नावानं ढोल का बडवले? असे उलट प्रश्नही यामुळं विचारले जाऊ लागले. जनतेकडून संतप्त प्रतिक्रिया उमटल्यानंतर आता कुठं उपरती होऊन पंतप्रधान मोदींसह सर्वच राज्य सरकारांनी आपल्या ताफ्यात कपात करण्याचं ठरवलंय. मोदी दोनच गाड्यांचा ताफा स्वतःसोबत ठेवतील. महाराष्ट्रातही मुख्यमंत्र्यांच्या परवानगीशिवाय विमान प्रवास करता येणार नाही. हे निर्णय नक्कीच स्तुत्य म्हणावे लागतील. पण, या काटकसरीनं प्रश्न खरोखरच सुटणार आहेत का?ही सर्व काटकसर प्रामुख्यानं इंधनांशी संबंधित आहे. अमेरिका-इराण युद्धामुळं निर्माण झालेली इंधन टंचाई हे या काटकसरीमागचं महत्त्वाचं कारण आहे. खरं तर अमेरिका-इराण संघर्ष आता बर्यापैकी निवळलेला आहे. इंधन वाहतुकीचा प्रमुख मार्ग असलेली होर्मुझची सामुद्रधुनीही पुढच्या दोन-तीन महिन्यात म्हणा किंवा जेव्हा युद्धविराम होईल तेव्हा खुली होईल.

शरीराला मिळतील आश्चर्यकारक फायदे

रोज एक फळ खाण्याची सवय लावा

बऱ्याच काळापासून असे म्हटले जाते की ताजी फळे खाण्याचे फायदे खूप आहेत. यामुळेच सर्वांनी ही वस्तुस्थिती स्वीकारून आपल्या आहारात फळांचा समावेश केला आहे. फळाची सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्यात अनेक प्रकारची जीवनसत्त्वे, खनिजे आणि आहारातील फायबरसारखे पोषक घटक आढळतात. यामुळे आपले शरीर मजबूत होते. फळे शरीराला चांगल्या प्रकारे कार्य करण्यास मदत करण्यासाठी विविध प्रकारचे पोषक प्रदान करतात. फळांमुळेच शरीराची प्रतिकारशक्ती वाढते आणि आपल्या पेशींना दुरुस्तीची संधी मिळते. जरी असे खूप कमी लोक असतील ज्यांनी दररोज एक फळ खाण्याचा विचार केला असेल. चला जाणून घेऊया रोज एक फळ खाणे आरोग्यासाठी का महत्त्वाचे आहे?

- **रक्तातील साखरेचे नियंत्रण :** सर्व फळांमध्ये नैसर्गिकरित्या साखर असते. त्यात फायबर आणि पोषक घटक देखील असतात. त्यांच्यामुळे रक्तप्रवाहात साखर शोषून घेण्याची क्षमता कमी होते. त्यामुळे रक्तातील साखरेची पातळी झपाट्याने वाढत नाही.
- **मानसिक आरोग्य :** फळांमध्ये नैसर्गिकरीत्या काही पोषक घटक असतात, ज्यामुळे आपले मानसिक आरोग्य चांगले राहते. याचे उत्तम उदाहरण म्हणजे जामुन, जे मानसिक आरोग्य सुधारणारे फळ म्हणून ओळखले जाते.
- **वजन नियंत्रणात ठेवा :** फळांची एक चांगली गोष्ट म्हणजे त्यामध्ये कॅलरीज कमी असतात. त्यात फॅटचे प्रमाणही कमी आढळते, तर फायबर आणि पाण्याचे प्रमाण अधिक असते. यामुळेच आहारात फळांचा समावेश केल्यास वजन नियंत्रित ठेवण्यास मदत होते.
- **अँटिऑक्सिडंट्स :** फळांमध्ये अँटिऑक्सिडंट्स मुबलक प्रमाणात आढळतात. यामुळे, तुमच्या पेशींना ऑक्सिडेटिव्ह ताणावामुळे होणारे नुकसान टाळण्याची संधी मिळते. अँटिऑक्सिडंट्स हृदयविकाराचा झटका, कर्करोग आणि न्यूरोडीजनरेटिव्ह विकारांचा धोका देखील कमी करतात.
- **पचन सुधारते :** फळे नैसर्गिक एन्झाईम्सने भरलेली असतात. यामुळे तुमची पचनक्रिया चांगली होते. उदाहरणार्थ, अननसातील ब्रोमेलेन आणि पपईतील पपेन हे पचनासाठी चांगले असतात. हे एन्झाइम प्रथिने तोडण्यास मदत करतात.



तुम्हालाही नखे कुरतडण्याची सवय आहे?

या उद्भवतात समस्या– नखातील मळ, घाण पोटात गेल्याने पोटदुखी आणि अपचन यासारख्या समस्या निर्माण होऊ शकतात. काही जणांना नखांबरोबर त्याच्या बाजूची त्वचा खाण्याचीही सवय असते. यामुळे नखांना नखुर्डे होण्याची शक्यता असते.

असा करा उपाय – काही मोठ्या व्यक्तीना देखील नखे खाण्याची इच्छा होते. याचे निरीक्षण करावे, समजा एखाद्या गोष्टीचा ताण आल्यावर किंवा एखाद्या गोष्टीची भीती वाटल्यावर नखे कुरतडली जातात. मात्र, अशावेळी शांतपणे विचार करा. स्वतःबाबत कोणत्याही प्रकारचा कमीपणा वाटून घेऊ नका. अतिविश्वास बाळगायला शिका. समस्यांना घाबरून न जाता सामोरे जायला शिका. कोणत्याही गोष्टींची उत्सुकता असेल त्यावेळी मन शांत ठेवत हात तोंडाकडे जाऊ देऊ नका.

रेसिपी

दहीवडा

'दहीवडा' साठी लागणारा साहीत्य:

- वड्यांसाठी : पाउण कप उडदाची डाळ, १/४ कप ओल्या खोर्बयाचे पातळ तुकडे, ४-५ मिरं, चवीपुरते मिठ, २ कप पातळ ताक, तळण्यासाठी तेल
- दही बनवण्यासाठी : दिड कप दही, ५-६ टेस्पून साखर, १ टिस्पून मिठ
- वरून भुरभूरवण्यासाठी : मिरपूड, लाल तिखट, चाट मसाला

'दहीवडा' साठी लागणारा कृती:

- उडीद डाळ पाण्यात ४-५ तास भिजत घालावी. पाणी काढून टाकावे. अगदी थोडेसेच पाणी घालून मिक्सरमध्ये बारीक वाटून घ्यावी. वाटलेले मिश्रण आपल्याला दाटसरच हवे आहे. इडलीच्या पिठापेक्षाही घट्ट असावे. वाटलेले मिश्रण हाताने किंवा हँड मिक्सरने फेटावे ज्यामुळे मिश्रणात हवेचे लहान बुडबुडे तयार होतात आणि वडे हलके व्हायला मदत होते. नंतर त्यात मिठ, ठेचलेले मिरं, आणि खोर्बयाचे पातळ काप घालावेत.
- वडे मध्यम आचेवर गोल आकारात किंवा मेदूवड्याच्या आकारात तळून घ्यावे. वड्यांचा आकार खुप मोठा ठेवू नये. काहीवेळेस वडे आतून कच्चे राहू शकतात.
- पातळ ताकात थोडी साखर आणि किंचीत मिठ घालावे. यामध्ये तळलेले वडे साधारण अर्धा ते एक तास बुडवून ठेवावे.
- तोवर वरून घालायचे दही तयार करून घ्यावे. वाडग्यात दही घ्यावे, रवीने नुसतेच घुसळून घ्यावे. मग किंचीत पाणी घालून आवश्यक तेवढा पातळपणा द्यावा. त्यात चवीनुसार साखर आणि मिठ घालावे. ढवळून घ्यावे. आणि थोडावेळ फ्रिजमध्ये गार करण्यास ठेवावे.
- सर्व्ह करताना ताकात भिजवलेले वडे प्लेटमध्ये घालावेत. त्यावर दही घालून वरती चाट मसाला, मिरपूड, आणि लाल तिखट घालावे.



हेल्थ आणि ब्यूटी साठी नारळाचा उपयोग

आपण सर्व नारळाचा वापर मुबलक प्रमाणात करतो. खाण्यापिण्यापासून ते धार्मिक, आरोग्य आणि सौंदर्याच्या दृष्टीकोनातून ते अत्यंत महत्त्वाचे मानले गेले आहे. हे विविध पाककृतींमध्ये वापरले जाते. चला आजच्या लेखात नारळाचे २२ उत्तम आरोग्य आणि सौंदर्य फायदे जाणून घेऊया...

नारळाचे फायदे

१.जर तुम्हाला पचनाचा त्रास होत असेल तर १ ग्लास नारळाच्या पाण्यात अननसाचा रस मिसळा आणि ९ दिवस प्या.

२.दम्याचा त्रास असलेल्या लोकांना नारळ पाणी पिण्याचा सल्ला दिला जातो.

३.नारळाच्या पाण्यात भरपूर पोटॅशियम असते. हे प्यायल्याने शरीरात कोणत्याही प्रकारची सुन्नता येत नाही.

४.नाकातून रक्त येत असेल तरीही नारळ पाणी पिणे फायदेशीर ठरते.

५.ज्यांना किडनीचा आजार आहे त्यांच्यासाठी नारळ पाणी खूप फायदेशीर आहे.

६.नारळ पाण्याचा आपल्या शरीराच्या त्वचेलाही फायदा होतो.

७.नारळपाणी मूत्राशयाशी संबंधित आजारांमध्ये खूप आराम देते.

८.मधुमेहाचा त्रास असलेल्या लोकांसाठी नारळ पाणी देखील खूप फायदेशीर आहे.

९.रात्रीच्या जेवणानंतर नियमितपणे अर्धा ग्लास नारळ पाणी प्या. यामुळे झोप न येण्याची समस्या दूर होते आणि चांगली झोप येते.

१०.नारळात प्रथिने, जीवनसत्त्वे, खनिजे, पोटॅशियम, फायबर, कॅल्शियम, मॅग्नेशियम आणि खनिज घटक मुबलक प्रमाणात आढळतात.

११.नारळाचा लगदा रक्तवहिन्यासंबंधी समस्या, अशक्तपणा, स्मरणशक्ती कमी होणे, फुफ्फुसावर उपचार करण्यासाठी वापरला जातो. त्वचेशी संबंधित आणि आतड्यांसंबंधी समस्याही ते बरे करतात.

१२. नारळात फॅट आणि कोलेस्ट्रॉल नसते, त्यामुळे नारळ लठ्ठपणापासून मुक्त होण्यासही मदत करतो. लठ्ठपणा कमी करण्यासाठी नारळ खूप फायदेशीर आहे. लठ्ठ व्यक्तींनी नारळाचे सेवन करावे.

१३.नारळाच्या दुधाने घसा खवखव दूर होतो.

१४.खोबरेल तेलात लिंबाचा रस किंवा ग्लिसरीन मिसळून चेहऱ्यावर लावल्याने पिंपल्स आणि डागही दूर होतात.

१५.खोबरेल तेलात बदाम मिसळून ते बारीक करून डोक्याला लावावे. यामुळे डोकेदुखीपासून त्वरित आराम मिळतो.

१६.के सांमधील कोंड्याच्या समस्येसाठी खोबरेल तेलात लिंबाचा रस मिसळून केसांना लावल्याने कोंडा आणि कोरडेपणा दूर होतो.

१७.नारळात आढळणारे आयोडीन थायरॉइड वाढण्यास प्रतिबंध करते.

१८. नारळात फायबर जास्त असते, त्यामुळे बद्धकोष्ठतेच्या रुग्णांसाठी ते फायदेशीर आहे.

१९.नारळ स्नायू वाढवण्यासाठी देखील उपयुक्त आहे.

२०.स्मरणशक्ती सुधारण्यातही नारळाची भूमिका असते. लहान मुलांना नारळ खायला दिल्याने त्यांचे मेंदु तेज होते.

२१.नारळाचे दूध पोटातील अल्सर बरे करण्यासाठी उपयुक्त आहे. नारळाचे दूध अतिशय पौष्टिक असते.

२२.पोटात जंत झाल्यास, एक चमचा किसलेले खोबरे सकाळी नाश्त्यात घेतल्याने पोटातील जंत लवकर मरतात. अशा प्रकारे नारळाचे अनेक फायदे आहेत.



कथा/ बोधकथा

गुळगुळीत गुलाबाची गोष्ट

एके काळी, दूर वाळवंटात एक गुलाबाची रोपटी होती ज्याला तिच्या सुंदर रूपाचा खूप अभिमान होता. तिची एकच तक्रार होती की ते कुरुप निवडुंगाच्या पुढे वाढत होते. रोज सुंदर गुलाब निवडुंगाचा अपमान करायचा आणि त्याच्या दिसण्यावर त्याची चेष्टा करायचा, तर निवडुंग गप्प बसायचा. आजूबाजूच्या इतर सर्व वनस्पतींनी गुलाबाला शांत करण्याचा प्रयत्न केला, परंतु ती तिच्या स्वतःच्या रूपात व्यस्त होती. तीव्र उष्णता, वाळवंट कोरडे झाले आणि झाडांना पाणी उरले नाही. गुलाब पटकन कोमेजायला लागला. त्याच्या सुंदर पाकळ्या सुकल्या, त्यांचा रसाळ रंग हरवला. एके दिवशी दुपारी गुलाबाला एक चिमणी पाणी पिण्यासाठी निवडुंगात आपली चोच बुडवताना दिसली. हे बघून गुलाबाच्या मनात काहीशी संकोच निर्माण झाला. लाज वाटली तरी गुलाबाने कॅक्टसला विचारले की तिला थोडे पाणी मिळेल का? याला प्रतिसाद म्हणून दयाळू निवडुंगाने लगेच होकार दिला. गुलाबाला त्याची चूक लक्षात आली, त्यांनी एकमेकांना या कडक उन्हाळ्यात मदत केली.

तात्पर्य : आपण या गोष्टीतून शिकतो की एखाद्या व्यक्तीचा त्याच्या दिसण्यावरून कधीही न्याय करू नका.



आंब्याची उष्णता कमी करण्यासाठी सोपे उपाय



आंब्याची उष्णता कमी करण्यासाठी सोप्या टिप्स

उन्हाळा आला की बाजारात रसाळ, गोड आंब्यांची रेलचेल सुरू होते. आंबा खाण्याचा मोह अनेकांना आवरत नाही. मात्र आंबा हा निसर्गतः उष्ण फळ मानला जातो. त्यामुळे जास्त प्रमाणात आंबे खाल्ल्यास अंगावर पुरळ येणे, पित्त वाढणे, पोट बिघडणे किंवा शरीरात उष्णता जाणवण्याचा त्रास काहींना होऊ शकतो. पण काही सोप्या घरगुती टिप्स वापरल्यास आंब्याची उष्णता कमी करून त्याचा मनसोक्त आनंद घेता येतो.

1) आंबे पाण्यात भिजवून ठेवा

आंबा खाण्यापूर्वी तो किमान 1 ते 2 तास थंड पाण्यात भिजवून ठेवणे हा सर्वात प्रभावी उपाय मानला जातो. यामुळे आंब्यातील उष्णता वाढवणारे घटक कमी होण्यास मदत होते. तसेच आंब्यावरील धूळ, माती आणि कीटकनाशकांचे अंशही निघून जातात.

2) आंब्यासोबत दूध किंवा तूप घ्या

आंब्याचा रस, मिल्कशेक किंवा आम्रखंड खाताना त्यात दूध किंवा थोडंसं तूप वापरणं फायदेशीर ठरतं. आयुर्वेदानुसार दूध आणि तूप शरीरातील पित्त संतुलित ठेवण्यास मदत करतात. त्यामुळे आंब्याची उष्णता कमी जाणवते.

3) सुंठ किंवा वेलचीचा वापर करा

आंब्याच्या रसामध्ये किंवा फोडींवर थोडी वेलची पूड किंवा सुंठ पावडर टाकल्यास पचन सुधारण्यास मदत होते. यामुळे गॅस, अपचन किंवा पोट फुगण्याचा त्रास कमी होऊ शकतो.

4) आंबा खाल्ल्यानंतर थंड दूध प्या

आंबा खाल्ल्यानंतर काही वेळाने एक ग्लास थंड दूध किंवा साधं पाणी पिणं फायदेशीर ठरतं. यामुळे शरीरातील वाढलेली उष्णता संतुलित होण्यास मदत मिळते.

5) रिकाम्या पोटी आंबा खाणं टाळा

सकाळी उपाशीपोटी आंबा खाल्ल्यास काहींमध्ये पित्त वाढण्याची शक्यता असते. म्हणून आंबा नेहमी जेवणानंतर किंवा दिवसभरात मर्यादित प्रमाणात खाणं अधिक योग्य मानलं जातं.

अतिरिक्त टिप्सही लक्षात ठेवाः

दिवसातून 1 ते 2 आंबेच खा.

भरपूर पाणी प्या.

जास्त गोड आंबे सतत खाणं टाळा.

उष्णतेचा त्रास होत असल्यास आंब्याचं प्रमाण कमी करा.

योग्य पद्धतीने आणि मर्यादित प्रमाणात आंब्याचं सेवन केल्यास तो शरीरासाठी पौष्टिक आणि ऊर्जा देणारा ठरतो. त्यामुळे काही साध्या सवयी पाळून उन्हाळ्यात आंब्याचा आनंद निर्धास्तपणे घेता येऊ शकतो.

गॅस वाचवण्याचे सोपे उपाय



वाढत्या महागाईचा परिणाम भारतावरही दिसून येत असून अमेरिका, इस्त्रायल आणि इराण यांच्यातील वाढत्या तणावामुळे आंतरराष्ट्रीय बाजारात तेल आणि गॅसच्या किमती वाढताना दिसत आहेत. अशा परिस्थितीत महिलांना घराचे बजेट सांभाळणे थोडे कठीण होत आहे. त्यामुळे आता स्वयंपाकघरात गॅसचा वापर काळजीपूर्वक करणे गरजेचे झाले आहे.ड्र' & ऋ्र

जर तुमचा छढऋ्र सिलेंडर साधारणपणे ३० दिवस चालत असेल आणि तुम्ही काही सोप्या किचन टिप्स अवलंबल्या, तर तोच सिलेंडर ४० ते ४५ दिवसांपर्यंत चालू शकतो. यामुळे वर्षभरात ३ ते ४ सिलेंडरची बचत होऊ शकते. आपण नकळत स्वयंपाकघरात अशा काही चुका करतो ज्यामुळे गॅस अधिक खर्च होतो. पण काही सवयी बदलल्यास गॅसची बचत सहज शक्य आहे.

खाद्यपदार्थ झाकून शिजवा

स्वयंपाक करताना भांड्यावर झाकण ठेवणे हा सर्वात सोपा आणि प्रभावी उपाय आहे. भांडे उघडे ठेवल्यास वाफेसोबत उष्णता बाहेर जाते आणि पदार्थ शिजण्यासाठी अधिक वेळ लागतो. झाकण ठेवल्यास वाफ आतच राहते आणि पदार्थ लवकर शिजतो. यामुळे सुमारे २० ते २५ टक्के गॅसची बचत होऊ शकते.

भांड्याचा योग्य आकार निवडा

स्वयंपाकासाठी वापरण्यात येणाऱ्या भांड्यांचा आकारही गॅस बचतीत महत्त्वाची भूमिका बजावतो. छोट्या बर्नरसाठी छोटे भांडेच वापरावे. मोठे भांडे छोट्या बर्नरवर ठेवल्यास गॅस जास्त खर्च होतो आणि अन्न योग्य प्रकारे शिजत नाही. त्यामुळे बर्नरनुसार भांडे निवडणे आवश्यक आहे.

डाळ आणि तांदूळ आधी भिजवून ठेवा

डाळ, तांदूळ, राजमा किंवा छोले यांसारख्या पदार्थांना शिजवण्यापूर्वी किमान अर्धा तास कोमट पाण्यात भिजवून ठेवावे. त्यामुळे ते मऊ होतात आणि लवकर शिजतात. कुकरमध्ये कमी शिट्ट्या लागतात आणि गॅसची बचत होते.

मध्यम आचेवर स्वयंपाक करा

अनेकजण लवकर स्वयंपाक करण्यासाठी मोठ्या आचेचा वापर करतात, पण त्यामुळे गॅस अधिक खर्च होतो. मध्यम आचेवर स्वयंपाक केल्यास गॅस कमी खर्च होतो आणि अन्नही चांगले शिजते.

प्रेशर कुकरचा अधिक वापर करा

गॅस बचतीसाठी प्रेशर कुकर अत्यंत उपयुक्त आहे. कुकरमध्ये वाफेचा दाब निर्माण होतो, त्यामुळे अन्न पटकन शिजते. डाळ, भाजी, भात आणि इतर अनेक पदार्थ कुकरमध्ये बनवल्यास वेळ आणि गॅस दोन्हीची बचत होते.

गॅस बर्नर स्वच्छ ठेवा

जर गॅस बर्नरमधून पिवळी ज्वाळा येत असेल, तर याचा अर्थ गॅस योग्य प्रकारे जळत नाही आणि बर्नरची छिद्रे बंद झाली आहेत. त्यामुळे गॅस अधिक खर्च होतो. म्हणून वेळोवेळी जुन्या टूथब्रशने तसेच लिंबू किंवा बेकिंग सोड्याच्या मदतीने बर्नर स्वच्छ करावा. स्वच्छ बर्नरमुळे निळी आणि तीव्र ज्वाळा मिळते, ज्यामुळे गॅसची बचत होते.

गॅसची बचत करणे म्हणजे फक्त पैसे वाचवणे नव्हे, तर नैसर्गिक साधनसंपत्तीचा योग्य वापर करणेही आहे. जर तुम्ही या सोप्या किचन टिप्स रोजच्या सवयीमध्ये आणल्या, तर तुमचा छढऋ्र सिलेंडर अधिक दिवस चालेल आणि महिन्याच्या खर्चातही चांगली बचत होईल.

Glass Skin म्हणजे काय? मिळवण्यासाठी रोज करा या गोष्टी



काचेसारखी चमकदार त्वचा हवीये? मग फॉलो करा Glass SkinRoutine"Chemistry

ग्लास स्किन हा एक लोकप्रिय कोरियन स्किनकेअर ट्रेंड आहे. यामध्ये त्वचा इतकी स्वच्छ, नितळ आणि चमकदार दिसते की चक्क काचेप्रमाणे ग्लो करते. सोशल मीडिया असो वा ब्युटी इन्फ्लुएन्सर्स, सध्या प्रत्येकजण या कोरियन ट्रेंडबद्दल बोलताना दिसत आहे. पण ही ग्लास स्किन घरबसल्या कशी मिळवता येईल? पाहुयात यासंदभार्तील टिप्स,

ह्यग्लास स्किनह्ल ही संकल्पना मूळची कोरियन सौंदर्यशास्त्रातील आहे. याचा अर्थ अशी त्वचा जी अत्यंत स्वच्छ, डागविरहित, गुळगुळीत आणि इतकी चमकदार असते की ती एखाद्या स्वच्छ काचेसारखी पारदर्शक वाटते.

ग्लास स्किन मिळवण्यासाठी काय करतात?

हायड्रेशन - त्वचा आतून आणि बाहेरून हायड्रेटेड ठेवणे ही गोष्ट के ब्युटीमध्ये अत्यंत महत्त्वाची असते. त्यामुळे स्किन हायड्रेशनसाठी भरपूर पाणी प्यावे आणि त्वचेला पोषकत्त्वे पुरवेल असे मॉइश्चरायझर लावावे.

नैसर्गिक घटकांचा वापर - दालचिनीचा फेस पॅक यांसारख्या नैसर्गिक घटकांचा वापर करून त्वचेचा पोत सुधारला जातो.

क्लिंजिंग ह्न दिवसातून दोनदा चेहरा स्वच्छ धुणे, ज्यामुळे छिद्रांमधील घाण निघून जाईल आणि त्वचा अधिक गुळगुळीत दिसेल.

Glass Skin रूटीनमध्ये वापरले जाणारे प्रमुख प्रॉडक्ट्स

जेंटल क्लिंजर हायड्रेटिंग टोनर

व्हिटामिन सी

हायल्यूरोनिक ॲसिड

शीट मास्क

लाईटवेट माइश्चरायजर

सनस्क्रीन

ग्लास स्किनसाठी घरगुती टिप्स

भरपूर पाणी प्यावे.

ॲलोवेरा जेल वापरावे.

तांदळाच्या पाण्याचा फेस मिस्ट म्हणून वापर करावा.

फळे आणि हिरव्या भाज्या आहारात वाढवा.

येत्या ४ ते ६ महिन्यांत पालखी मार्ग पूर्ण होणार

पालखी महामार्गाचे ८० टक्क्यांहून अधिक काम पूर्ण

■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक

संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराज पालखी महामागार्चे काम ८० टक्क्यांहून अधिक पूर्ण झाले असून, येत्या ४ ते ६ महिन्यांत हे दोन्ही आधुनिक मार्ग पूर्णपणे वारकऱ्यांच्या सेवेत दाखल होतील, अशी महत्त्वपूर्ण घोषणा केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी केली. फलटण येथे पालखी मागार्ची प्रत्यक्ष पाहणी केल्यानंतर आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

या महामार्गांच्या सद्यस्थितीबद्दल माहिती देताना गडकरी म्हणाले की, २३४ किलोमीटर लांबीचा संत ज्ञानेश्वर महाराज पालखी मार्ग ७,६२५ कोटी रुपये खर्चून उभारला जात आहे. मोहळ ते हडपसर या टप्प्यांमध्ये विभागलेल्या या कामापैकी दिवे घाट ते हडपसर या भागात ६५ टक्के, तर धरमपुरी ते लोणंद या भागात ९८ टक्के काम पूर्ण झाले आहे. विशेषतः दिवे घाटातील १७ हेक्टर वनविभागाच्या जागेचा अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला प्रश्न मार्गी लावून तेथे डोंगराचे उत्खनन करून चार पदरी रस्ता तयार करण्यात आला आहे.

१३० किलोमीटर लांबीचा संत तुकाराम महाराज पालखी मार्ग ४,४१६ कोटी रुपये खचार्चा असून, त्यातील पाटस ते बारामती हा टप्पा पूर्ण झाला आहे, तर इंदापूर ते तोंडले आणि बारामती ते इंदापूर या टप्प्यांचे काम ९० टक्क्यांहून अधिक पूर्ण झाले आहे. जेजुरी येथील वाहतूककोंडी सोडवण्यासाठी २५० कोटी रुपयांचा २ किलोमीटर लांबीचा उड्डाणपूल उभारण्यात येणार असून, फलटण



शहरातील अंतर्गत रस्ते विकासासाठी ९७ कोटी रुपयांचा निधी जाहीर करण्यात आला आहे. तोंडले येथे दोन्ही पालखी मार्ग एकत्र येतात, त्या ठिकाणी १०० कोटी रुपयांचा भव्य उड्डाणपूल उभारला जाणार आहे. तसेच टेंभुर्णी-पंढरपूर या ४८ किलोमीटरच्या मार्गासाठी ९५० कोटी रुपये मंजूर करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.भविष्यातील कनेक्टिव्हिटीबाबत बोलताना त्यांनी सांगितले की, येणाऱ्या काळात मुंबई ते बंगळुरू प्रवास अवघ्या साडेपाच तासांत, तर पुणे ते छत्रपती संभाजीनगर दोन तासांत पूर्ण होईल. तसेच पुणे ते नागपूर साडेचार तासांत गाठता येईल. सुरत-नाशिक-अहमदनगर-सोलापूर-कर्नूल या नव्या कॉरिडॉरमुळे चेन्नई ते दिल्ली अंतर ३२० किलोमीटरने कमी होईल आणि पुणे-मुंबई मार्गावरील वाहतुकीचा ताण ५० टक्क्यांनी घटेल.

स्वतंत्र 'वारकरी लेन'

वारकऱ्यांच्या सुरक्षिततेचा विचार करून या महामार्गांवर साडेतीन मीटरची स्वतंत्र 'वारकरी लेन' ठेवण्यात आली आहे, ज्यामुळे पायी चालणाऱ्या भाविकांचा प्रवास अधिक सुरक्षित आणि सुलभ होईल. ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांगांसाठी इलेक्ट्रिक लिफ्टसह आधुनिक फूटओव्हर ब्रिज उभारण्याच्या सूचनाही गडकरी यांनी दिल्या. या पुलांवरून दुचाकी आणि तीनचाकी वाहनेही नेता येणार आहेत.

४६ खड्ड्यांचे रूपांतर तलावांमध्ये

या महामार्गांच्या बांधकामात तांत्रिक आणि पर्यावरणीय दृष्टिकोनातून महत्त्वपूर्ण बदल करण्यात आले आहेत. मलेशियातील आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून पुलांच्या दोन खांबांमधील अंतर १२० मीटरपर्यंत वाढवण्यात आले आहे. या बांधकामात पोलादी सळ्यांऐवजी 'अल्ट्रा हाय परफॉर्मन्स फायबर रिइन्फोर्स्ड कॉंक्रीट'चा वापर करण्यात आला असून, ते लोखंडापेक्षा चौपट मजबूत असल्याचा दावा करण्यात आला आहे. पर्यावरण संरक्षणासाठी महामार्गाच्या कडेला ४० हजार झाडे लावण्यात आली असून, त्यात 'ज्ञानेश्वरी'मध्ये उल्लेख असलेल्या वृक्षप्रजातींना प्राधान्य देण्यात आले आहे. तसेच रस्त्यासाठी लागणारी माती काढताना तयार झालेल्या ४६ खड्ड्यांचे रूपांतर तलावांमध्ये करून मोठी जलसाठवण क्षमता निर्माण करण्यात आली आहे.

नवापूरमध्ये बर्ड फ्ल्यूचा प्रादुर्भाव

चार दिवसांत १.९३ लाख कोंबड्या नष्ट

■नंदुरबार। प्रतिनिधी,

जिल्ह्यातील नवापूर तालुक्यात बर्ड फ्ल्यूचा प्रादुर्भाव गंभीर स्वरूप धारण करत असून कुक्कुटपालन व्यवसायाला मोठा फटका बसला आहे. अवघ्या चार दिवसांत जवळपास १ लाख ९३ हजारांहून अधिक कोंबड्या, ८ लाखांपेक्षा जास्त अंडी आणि सुमारे २१ टन पशुखाद्य नष्ट करण्यात आले आहे. काही दिवसांपूर्वी अचानक कोंबड्यांचा मृत्यू वाढल्याने पशुसंवर्धन विभाग सतर्क झाला. मृत पक्ष्यांचे नमुने तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठवण्यात आले असता त्यात बर्ड फ्ल्यू विषाणूची पुष्टी झाली. त्यानंतर प्रशासनाने तातडीने नियंत्रणात्मक उपाययोजना राबवत बाधित क्षेत्रात कत्तल मोहीम सुरू केली. या मोहिमेदरम्यान विविध पोल्ट्री फार्ममधील कोंबड्या, अंडी आणि पशुखाद्य मोठ्या प्रमाणावर नष्ट करण्यात आले. चौथ्या दिवशी मुजतबा आणि परवेज पोल्ट्री फार्ममध्येच ५६ हजारांहून अधिक पक्ष्यांचा नाश करण्यात आला. नवापूर हा भाग कुक्कुटपालन व्यवसायासाठी ओळखला जातो. मात्र या प्रादुर्भावामुळे शेतकरी आणि व्यावसायिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून मोठ्या आर्थिक नुकसानीची शक्यता वर्तवली जात आहे. प्रशासनाने बाधित परिसरात निर्बंध लागू केले असून पोल्ट्री उत्पादनांची वाहतूक व विक्रीवर नियंत्रण ठेवण्यात आले आहे. सध्या पशुसंवर्धन विभागाचे सुमारे ५० कर्मचारी आणि विशेष पथके परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी कार्यरत आहेत.नागरिकांनी घाबरून न जाता प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

झाडांची होणार शास्त्रीय नोंद... ८ वर्षांनंतर खासगी कंपनी करणार वृक्षगणना

झाडांची संख्या घटली की वाढली हे स्पष्ट होणार

■मुंबई । प्रतिनिधी,

आठ वर्षांनंतर मुंबईत नेमकी किती झाडे आहेत, विकासकामांमुळे किती झाडे कमी झाली, झाडांचे पुनर्रोपण केल्याने संख्या वाढली का याची इत्यंभूत माहिती मुंबईकरांना मिळणार आहे. विशेष म्हणजे मुंबईतील वृक्षांची शास्त्रीय नोंद घेण्यात येणार आहे. 'सार आयटी संशोधन' या खासगी कंपनीच्यावतीने मुंबईतील झाडांची गणना करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. पुढील दोन वर्षांत याचा अहवाल प्राप्त होणे अपेक्षित आहे.

मुंबईचा विकास झपाट्याने होत असून पायाभूत प्रकल्प राबवण्यात येत आहेत. विकासकामांत अडथळा ठरणारी झाडांची कापणी करण्यात येते आणि दुसरीकडे पुनर्रोपण करण्यात येते. मुंबईत सद्यःस्थितीत २९ लाख ७५ झाडे आहेत. मुंबईत दर पाच वर्षांनी झाडांची गणना होणे अपेक्षित असते. मात्र, आता ८ वर्षांनंतर वृक्षगणना होत



आहे. वृक्षगणनेत जास्तीत जास्त वृक्षप्रेमी, पर्यावरणतज्ज्ञ, वनस्पती शास्त्रातील विद्यार्थी, उद्यान विभागातील अधिकारी तसेच याबाबत आवड असलेल्या महापालिकेच्या अन्य विभागातील अधिकारी यांचा समावेश करण्याचा महानगरपालिकेचा प्रयत्न आहे. याचाच एक भाग म्हणून महानगरपालिकेमार्फत वीरमाता जिजाबाई भोसले उद्यान येथे प्रशिक्षण सेमिनार आयोजित करण्यात आले होते. यावेळी मोठ्या प्रमाणात वृक्षप्रेमी, पर्यावरण तज्ज्ञ, विद्यार्थी यांनी उपस्थिती नोंदवली होती. याशिवाय विविध कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांना, पर्यावरण तज्ञांना प्रशिक्षण देण्याचे काम सुरू आहे.

आपल्या सोसायटीमध्ये येणाऱ्या प्रगणकांना वृक्षगणनेसाठी आवश्यक सहकार्य करावे, असे आवाहन पालिकेच्या उद्यान विभागाचे अधीक्षक जितेंद्र परदेशी यांनी केले आहे.

प्रशिक्षण शिबिराचे आयोजन

राम निरंजन झुनझुनवाला कॉलेज या ठिकाणीही प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले होते. यावेळी वनस्पती शास्त्रातील विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणात या उपक्रमात आपला सहभाग नोंदवला. वृक्षांची शास्त्रीय गणना तसेच अन्य गोष्टी म्हणजे वृक्षांची प्रजाती, वृक्षांचे वय, वृक्षांचे आरोग्य याबाबत तसेच यासाठी वापरली जाणारी आधुनिक उपकरणे, मोबाईल ॲप इत्यादी माहितीचे या शिबिरात प्रशिक्षण देण्यात आले.

वाकोला येथील सीसी रस्त्याचे काम थांबले

इकडे आड, तिकडे विहीर! रस्त्यात विहीर आडवी आली, पण कोणी नाही पाहिली

■मुंबई । प्रतिनिधी,

'डीपी' रोडची सुधारणा करण्यासाठी सिमेंट काँक्रीटचा रस्ता करण्याचा निर्णय पालिकेच्या रस्ते विभागाने घेतला आहे. वाकोला येथे 'सीसी' रस्त्याचे अर्धे काम जवळपास पूर्ण होत असताना मधोमध ६० वर्षे जुनी विहीर असल्याने पालिकेची कोंडी झाली आहे. विहीर बुजवणे नियमात बसत नाही आणि रस्त्याचे काम अर्धवट सोडणे शक्य नाही. त्यामुळे 'रस्त्यात विहीर आडवी आली, पण कोणी नाही पाहिली', अशी अवस्था पालिकेची झाली आहे.

खड्डेमुक्त मुंबईसाठी सिमेंट काँक्रीटचे रस्ते करण्यावर पालिका प्रशासनाने भर दिला आहे. त्याचाच एक भाग म्हणून वाकोला येथील 'डीपी' रोडची सुधारणा करण्यासाठी सीसी रस्त्याचे काम हाती घेण्यात आले आहे. मात्र, रस्त्याला लागूनच जुनी विहीर असल्याचे काम सुरू असताना निदर्शनास आले. विहीर



बुजवायची की, त्यावर लोखंडी मजबूत ग्रील बसवायची याबाबत पालिकेचा पर्यावरण, कीटकनाशक विभाग व रस्ते विभाग विचार करत असल्याचे पालिका प्रशासनाकडून सांगण्यात आले.

प्रभाग क्र. ८८ मधील खांडवाला कंपाऊंड, वाकोला पाईपलाईन ते रुपवाल अपार्टमेंट या रस्त्यावर ६० वर्षे जुनी विहीर असून या विहिरीला झरा नसल्यामुळे ती वापरात नाही. त्यामुळे स्थानिक तिचा वापर कचरा टाकण्यासाठी करत असल्याने परिसरात दुर्गंधी पसरून आरोग्यास घातक परिस्थिती निर्माण झाली आहे. यामुळे रहिवाशांना प्रचंड प्रमाणात त्रास सहन करावा लागत आहे. हा रस्ता ४० फूट 'डीपी' रोड रुंद असून सध्या पालिकेच्यावतीने येथे बॉक्स ड्रेनसह सिमेंट काँक्रीटचे काम करत आहे. मात्र, या कामात विहीर आडवी आल्याने रस्त्याचे काम रखडले आहे, असा आरोप ठाकरे सेनेच्या नगरसेविका श्रवरी परब यांनी केला आहे.

...अन्यथा पुढील कार्यवाही करणार!

'डीपी' रोडची सुधारणा करण्यासाठी वाकोला पाईप लाईन ते रुपवाला अपार्टमेंट दरम्यान 'सीसी' रस्त्याचे काम सुरू आहे. हे काम करताना रस्त्याला लागून विहीर असल्याचे आढळले. याबाबत पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाकडे पत्रव्यवहार केला आहे. त्यांनी रस्ता व विहीर यावर तोडगा काढण्यासाठी दोन महिन्यांची वेळ मागितली आहे. दोन महिन्यांत तोडगा काढला नाही, तर पुढील कार्यवाही करण्यात येईल, असा इशारा श्रवरी परब यांनी दिला आहे.

पत्नी नांदायला येत नसल्याने पती संतापला

पोटच्या 2 लेकरांना डिझेल टाकून जाळण्याचा प्रयत्न

■बीड। प्रतिनिधी,

बीड जिल्ह्यातील माजलगाव तालुक्यातील लहामेवाडी येथे काळजाचा ठोका चुकवणारी एक अत्यंत संतापजनक घटना उघडकीस आली आहे. आपल्या संसारातील कुरबुरीचा राग पोटच्या निष्पाप मुलांवर काढत एका पित्याने अमानवीयतेची सीमा ओलांडली आहे. पत्नी माहेरून नांदायला परत येत नसल्याच्या कारणावरून संतापलेल्या या पित्याने स्वतःच्या दोन चिमुकल्या मुलांच्या अंगावर डिझेल ओतून त्यांना जिवंत जाळण्याचा प्रयत्न केला. या भयानक प्रकारामुळे लहामेवाडी परिसरात मोठी खळबळ उडाली असून कौटुंबिक वादातून एखादा पिता इतक्या खालच्या थराला जाऊ शकतो, हे पाहून सर्वत्र संताप व्यक्त केला जात आहे. सुदैवाने, या घटनेत मुलांचा जीव वाचला असला तरी या बापाच्या क्रूरपणामुळे खळबळ उडाली आहे.

पत्नीच्या विरहातून पित्याचा हैवान अवतार; डिझेल ओतून चिमुकल्यांना संपवण्याचा कट

या प्रकरणातील आरोपी पित्याचे नाव महेश सामसे असे असून, गेल्या काही दिवसांपासून त्याची पत्नी कौटुंबिक वादामुळे



माहेरी राहत होती. महेशने आपल्या पत्नीला वारंवार नांदायला येण्यासाठी बोलावले, मात्र ती परत येत नसल्याने तो कमालीचा मानसिक तणावात आणि रागात होता. याच रागाचा भरात त्याने गुरुवारी आपल्या दोन लहान मुलांवर आपला सर्व संताप काढण्याचे ठरवले आणि त्यांच्या अंगावर डिझेल टाकून त्यांना पेटवून देण्याचा क्रूर प्रयत्न केला. आपल्या पोटच्या लेकरांच्या जीवावर उठलेल्या या पित्याच्या हैवान अवतारामुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले होते. स्वतःच्या पोटच्या मुलांवर असा जीवघेणा हल्ला करण्याच्या या प्रकाराने संपूर्ण परिसरात भीतीचे वातावरण आहे.

स्थानिक नागरिकांच्या सतर्कतेमुळे टळला अनर्थ; मुलांची सुखरूप सुटका

महेश सामसे याने जेव्हा आपल्या मुलांवर डिझेल टाकले, तेव्हा या घटनेची कुणकुण परिसरातील नागरिकांना लागली. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून गावातील नागरिकांनी तातडीने घटनास्थळाकडे धाव घेतली आणि मुलांना वाचवले. नागरिकांनी मोठ्या धाडसाने मुलांना महेशच्या तावडीतून सोडवून सुरक्षित ठिकाणी हलवले, ज्यामुळे एक मोठा अनर्थ टळला आणि त्या निष्पाप चिमुकल्यांचे प्राण वाचले. या घटनेनंतर गावामध्ये महेश सामसे याच्याविरुद्ध प्रचंड संतापाची लाट असून त्याच्यावर कठोर कारवाई करण्याची मागणी केली जात आहे.

माजलगाव ग्रामीण पोलिसांकडून गुन्हा दाखल; आरोपी पित्यावर कायदेशीर कारवाई सुरू

घटनेची माहिती मिळताच माजलगाव ग्रामीण पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन परिस्थितीवर नियंत्रण मिळवले आहे. याप्रकरणी पोलिसांनी महेश सामसे याच्यावर विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला असून त्याला ताब्यात घेण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. कौटुंबिक वादातून स्वतःच्या लेकरांच्या जीवावर उठणाऱ्या अशा गुन्हेगारी प्रवृत्तीला आळा घालण्यासाठी पोलीस सखोल तपास करत आहेत.

बुलढाणा हादरला! सामानासाठी आलेल्या

घटस्फोटित पत्नीवर पहिल्या पतीचा चाकू हल्ला

■बुलढाणा। प्रतिनिधी,

बुलढाणा जिल्ह्यातील सिंदखेड राजा शहरात एक अत्यंत धक्कादायक आणि रक्तरंजित घटना उघडकीस आली आहे. आपल्या पहिल्या पतीच्या घरी घरगुती सामान आणि स्वतःच्या मुलाला आणण्यासाठी गेलेल्या एका घटस्फोटित महिलेवर तिच्या पहिल्या पतीनेच धारदार चाकूने जीवघेणा हल्ला केल्याचा प्रकार घडला आहे. या हल्ल्यात महिला गंभीर जखमी झाली असून, तिच्यावर सध्या छत्रपती संभाजीनगर येथे उपचार सुरू आहेत.

नेमकी पार्श्वभूमी काय?

मिळालेल्या माहितीनुसार, रिजवान शेख मंजूर आणि नाझिया परवीन असे या पहिल्या दांपत्याचे नाव आहे. काही महिन्यांपूर्वीच या दोघांचा



घटस्फोट झाला होता. घटस्फोटानंतर नाझिया परवीन हिने शेख शाबीर मोहम्मद शाबीर यांच्यासोबत पुनर्विवाह केला प्राथमिक माहितीनुसार, या दोघांचे आधीपासूनच विवाहबाह्य प्रेमसंबंध होते. दुसऱ्या विवाहानंतर नाझिया आणि तिचे नवीन पती शेख शाबीर हे दोघे छत्रपती संभाजीनगर येथे वास्तव्यास होते.

नेमकी घटना कशी घडली?

नाझिया परवीन यांचा घटस्फोट झाला असला तरी, त्यांचे काही घरगुती सामान आणि त्यांचा मुलगा पहिल्या पतीकडे म्हणजेच रिजवान शेख याच्याकडेच सिंदखेड राजा येथे होता. हेच उर्वरित सामान आणि आपल्या मुलाला सोबत नेण्यासाठी नाझिया सिंदखेड राजा येथे पहिल्या पतीच्या घरी गेल्या होत्या. मात्र, तिथे गेल्यावर आधीचा पती रिजवान शेख याने जुन्या रागातून नाझिया यांच्यावर चाकूने सपासप वार करत प्राणघातक हल्ला केला. या भयंकर आणि हिंसक कृत्यात रिजवानच्या इतर दोन नातेवाईकांनीही त्याला सहकार्य केले.

सध्याची परिस्थिती आणि पोलिसांची कारवाई

या हल्ल्यात नाझिया परवीन या गंभीररीत्या जखमी झाल्या आहेत. त्यांना तातडीने उपचारासाठी छत्रपती संभाजीनगर येथील रुग्णालयात हलवण्यात आले असून, सध्या त्यांच्यावर वैद्यकीय उपचार सुरू आहेत. या धक्कादायक घटनेनंतर नाझिया यांचे दुसरे पती शेख शाबीर यांनी सिंदखेड राजा पोलीस ठाण्यात धाव घेत रीतसर तक्रार दाखल केली. शेख शाबीर यांच्या तक्रारीच्या आधारे सिंदखेड राजा पोलिसांनी पहिला पती रिजवान शेख आणि त्याला साथ देणाऱ्या इतर दोन नातेवाईकांवर असे एकूण तीन जणांवर गुन्हा दाखल केला आहे.

कठोर कारवाईची मागणी

भरदिवसा घडलेल्या या प्राणघातक हल्ल्यामुळे सिंदखेड राजा परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. फियार्दी शेख शाबीर यांनी तिन्ही आरोपींना तात्काळ बेड्या ठोकून त्यांना कठोर शिक्षा करण्याची मागणी पोलिसांकडे केली आहे. सिंदखेड राजा पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

आई आणि मुलीची आत्महत्या

जमिनीसाठी पतीने केला अमानुष छळ

■नागपूर। प्रतिनिधी,

नागपुरातील व्यंकटेशनगरमध्ये घडलेल्या माय-लेकीच्या आत्महत्येच्या प्रकरणामागील धक्कादायक कारण अखेर समोर आले आहे. जमिनीच्या वादातून पती आणि सासरच्या मंडळींकडून सुरू असलेल्या छळाला कंटाळून दोघींनी हा टोकाचा निर्णय घेतल्याची माहिती तपास केल्यानंतर समोर आली आहे.

नागपुरातील व्यंकटेशनगर परिसरात आई आणि मुलीने एकाच वेळी गळफास लाऊन आत्महत्या केली होती, या घटनेने संपूर्ण शहर हादरले होते. या प्रकरणाचा तपास करताना नंदनवन पोलिसांना गंभीर आणि संतापजनक माहिती मिळाली आहे. पत्नी आणि तिच्या आईच्या नावावर असलेली संपत्ती स्वतःच्या नावावर करून घेण्यासाठी पती लोकेश ब्रह्मे आणि त्याच्या कुटुंबीयांनी सातत्याने मानसिक आणि शारीरिक छळ केल्यामुळेच या दोघींनी आत्महत्या केल्याचे उघड झाले आहे.

पैशांसाठी छळ, बाळाच्या मृत्यूनंतर वाढला त्रास

१ मे २०२६ रोजी संगीता श्रीराम ढबाले (वय ५२) आणि त्यांची मुलगी आकांक्षा लोकेश ब्रह्मे (वय २९) यांनी आत्महत्या केली होती. तपासादरम्यान समोर आले की, आकांक्षाच्या लग्नानंतर तिचा पती लोकेश, सासू अनसूया, सासरा सुधाकर, नणंद प्राची आणि तिचा पती अमोल डफ यांनी तिचा छळ सुरू केला होता, माहेरून पैसे आणण्यासाठी हा छळ सुरू होता. दोन महिन्यांपूर्वी आकांक्षाला मुलगी झाली होती, मात्र जन्मानंतर लगेचच त्या बाळाचा मृत्यू झाला. या दुःखद घटनेनंतर सासरच्या मंडळींनी तिच्यावरचा छळ आणखी तीव्र केला.

जमिनीवर डोळा, अत्याचाराची परिसीमा

या छळाची परिसीमा तेव्हा गाठली गेली, जेव्हा आरोपींनी आकांक्षा आणि तिची आई संगीता यांच्या नावावर असलेली जमीन लोकेशच्या नावावर करण्यासाठी जबरदस्ती करण्यास सुरुवात केली. या मागणीसाठी आकांक्षाला वारंवार मारहाण करण्यात येत होती आणि तिला अत्यंत क्रूर वागणूक दिली जात होती. या अखंड त्रासाला कंटाळून आकांक्षा आपल्या आईकडे व्यंकटेशनगर येथे आली आणि शेवटी माय-लेकीने एकत्र गळफास घेऊन आत्महत्या केली व आपले जीवन संपवले.

या प्रकरणात नंदनवन पोलिसांनी आकांक्षाचे मामा विलास केशवराव पिसे यांच्या तक्रारीवरून पती लोकेश ब्रह्मे याच्यासह सासरच्या पाच जणांविरुद्ध हुंडाबळी आणि छळवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे. पोलीस या घटनेचा अधिक तपास करत असून पुढील कारवाई सुरू आहे.

प्रेमसंबंधातून नवऱ्याने बायकोच्या प्रियकराचा कान चावून तोडला... दात तोडून जागेवर संपवलं

■मुंबई । प्रतिनिधी,

तरुणाने अनैतिक संबंधातून आपल्या पत्नीच्या प्रियकराची निर्घृणपणे हत्या केली. क्रूरतेचं टोक गाठत आरोपी नवऱ्याने पत्नीच्या प्रियकराचा दातांनी चावा घेत कान तोडला, नंतर दात तोडले. आरोपी एवढ्यावरच न थांबता त्याने पुढे प्रियकराच्या पोटात लाकडाने हल्ला केला. या प्रकरणात आरोपी पतीची ओळख अशोक मसीह अशी समोर आली आहे. महिलेच्या प्रियकराची डेव्हिड अशी ओळख समोर आली आहे. तसेच अशोकच्या पत्नीचे नाव रिंपी डेव्हिड असल्याचे सांगण्यात येते. या घटनेनं परिसर हादरून गेला आहे.

नेमकं काय घडलं?

पत्नी रिंपीने पोलिसांना सांगितलं की, रात्री उशिराने तिचा पती अशोक हा अमृतसरहून मोटारसायलवरून परतत होता. ती आणि तिचा मुलगा सॅम्युअल मसीह, त्यांच्यामागे येत होते. बोहाडू गावाकडून मडियालाच्या दिशेने प्रवास करताना, अशोक मसीह तसेच च्याचा मुलगा अभिषेक आणि इमॅन्युअल उर्फ मनी हे मागून मोटारसायकलवरून आले होते.

आरोपीने मोटारसायकल थांबवून प्रेयसीच्या बॉयफ्रेंडला संपवलं

आरोपीने तिच्या पतीची मोटारसायकल थांबवली आणि त्याच्यावर प्राणघातक हल्ला केला. इतक्यातच आरोपीने तिच्या पतीवर अनेकदा वार केले, नंतर या हल्ल्यात तिच्या पतीला मार लागला होता. अमृतसरच्या सिव्हिल रूग्णालयात नेण्यात आले, जिथे डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. या प्रकरणाची माहिती मिळताच, पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली.



अशातच पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केल्याचे सांगितले. मृत व्यक्ती डेव्हिड मसीहचे आरोपी अशोक मसीहच्या पत्नीशी अनैतिक प्रेमसंबंध होते. याचाच राग मनात धरून ही हत्या करण्यात आली होती.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com